
MAHMAR/ 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष पंधरावे / अंक १२ / डिसेंबर २०१४

## संपादकीय

### पहाट कधी होणार ?

भारतामध्ये सध्या जे काही घडत आहे ते बघून डोक्याला मुंग्या आल्याशिवाय राहत नाहीत. खून, बलात्कार, अपहरण, पैशाला पासरीभर झालेले संत आणि साध्वी, आणि त्यांची आचरट वक्तव्ये, ही कुठल्याही संस्कृतीला शरमेने मान खाली घालायला लावतील अशीच आहेत. विज्ञान, अध्यात्म किंवा जडवाद या विचारसरणीमध्ये कुठेही तर्कसंगती किंवा तारतम्य ठेवणाऱ्या या घटना नाहीत. ऊर बडवून आपण एका महान संस्कृतीचे वारसदार आहोत हे सांगणारे, या घटनांची जी चिकित्सा करतात तीही तेवढीच भयानक आहे.


जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांमध्ये आज हा तारतम्यभाव हरवलेला दिसतो. आपला पक्ष, पंथ, नेतृत्व यांचे येनकेनप्रकारे समर्थन करणे एवढे एकच काम हे त्या त्या गटाच्या अनुयायांना राहिलेले दिसते. राजकारणामध्ये वैचारिक सिद्धान्तवाद आता पोरका झाला आहे. सर्वच पक्षामध्ये घराणेशाही आणि जातीयवाद यांचे उघडपणे समर्थन चालू आहे. आपला समाज किंवा जात ही सर्वात मागसलेली कशी आहे हे सिद्ध करण्याची स्पर्धा, आणि आग्रह हा सगळे तर्कशास्त्र बधिर करणारा आहे. येन केन मार्गांनी फक्त सत्ता मिळवणे हा एक कलमी कार्यक्रम असलेल्या सर्वच राजकिय पक्षांची याला असलेली सहमती मती गुंग करणारी आहे. दूरदर्शनवर पक्षप्रतिनिधींचा आपल्या पक्षनेत्यांच्या धोरणांचे हास्यापद, पोरकट आणि आक्रस्ताळेपणे चालू असलेल्या समर्थनाचा आता उबग आला आहे. गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्रात घडत असलेले राजकिय नाट्य हे याची साक्ष आहे.

शब्दकोशांमध्ये शब्दांचा अर्थ देताना, त्याला परंपरा आणि संस्कृतीचे एक कोंदण असते. नदीचा अर्थ डोंगर होऊ शकत नाही, किंवा विमानाचे माकड होऊ शकत नाही. आज मात्र अस्मिता, सत्य, समाजवाद, धर्मनिरपेक्षता या शब्दांचा राजकारण्यांनी लावलेला अर्थ आणि शब्दकोशांतील अर्थाचा काडीचाही संबंध राहिलेला नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमधील उमेदवारांनी जाहीर केलेल्या संपत्तीचे आकडे चक्रावून टाकणारे आहेत. बांधकामाव्यतिरिक्त कुठलाही ज्ञात व्यवसाय नसलेला आपला प्रतिनिधी कोटी कोटींची उड्डाणे कशी घेतो हे अनाकलनीय आहे. कुठल्याही पक्षाला

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

बहुसंख्येने गुन्हेगारी आरोप असलेले उमेदवार मिळू शकतात, परंतु साधी पदवी असलेले पदावीधर मिळू शकत नाहीत हेही एक मोठे गौडबंगालच आहे. चोर, गुन्हेगार, बदमाश हे तुपाशी, तर प्रामाणिक, नेमस्त उपाशी, हाच या युगाचा न्याय दिसतो. तर्क, सुसंगती आणि तारतम्य यांना शंभर टक्के सोडचिठ्ठी दिल्याशिवाय अशा समाजाची निर्मिती होऊच शकत नाही. जगात सगळीकडे कमीजास्त प्रमाणात ही परिस्थिती असली तरी थोडेतरी तारतम्य तेथे दिसून येते.




**श्री. वॅटसन (Watson)**

१९५३ साली श्री. वॅटसन (Watson) या शास्त्रज्ञांनी फ्रान्सिस क्रिक (Francis Crick) आणि मॉरिस विल्किन्स (Maurice Wilkins) यांच्या सहयोगाने डीएनए (DNA) च्या रचनेची उकल केली. वॅटसन आणि त्यांच्या सहकाऱ्यांना याकरता १९६२ साली नोबेल पारितोषिक मिळाले. सहाजिकच वॅटसन हे जगातल्या अनेक महत्त्वाच्या कंपन्यांवर संचालक झाले, आणि अनेक विद्यापीठांतून त्यांना मानाची पदे मिळाली. संशोधन किंवा विज्ञानाला मिळणारे यथोचित असेच ते सन्मान होते. २००७ सालच्या ‘संडे टाइम्स’मध्ये त्यांची एक मुलाखत छापली गेली. त्या मुलाखतीमध्ये आफ्रिकन वंशाचे लोक जन्मजात बुद्ध्यांकाने कमी असतात असे एक विधान त्यांनी केले. वॅटसन स्वतः वंशवादी नाहीत. त्यांना एवढेच सांगायचे होते की, सर्वांच्या क्षमता जन्मजात सारख्या नसतात आणि, हे जर आपण लक्षात घेतले नाही तर कमी क्षमतेच्या लोकांवर तो फार मोठा अन्याय असतो. अर्थातच त्यांची ही भूमिका नाकारून त्यांच्यावर ‘वंश’वादाचा शिक्का बसला. त्यामुळे त्यांना सर्व पदांवरून पदच्युत करण्यात आलेच, पण तेव्हापासून आजपर्यंत विज्ञान जगतांनेही त्यांच्यावर बहिष्कारच टाकला. वॅटसन हे संवेदनशील शास्त्रज्ञ आहेत. या एकाकीपणामुळे ते खचून गेले. याचाच एक परिणाम म्हणून त्यांनी आपले नोबेल पारितोषिकाचे मानचिन्ह जागतिक बाजारपेठेत विक्रीला काढले. पस्तीस लाख डॉलर्सपर्यंत त्याला किंमत येईल अशी अपेक्षा होती. या मिळणाऱ्या पैशाचा विनियोग, ज्या विद्यापीठांनी त्यांना संशोधनाकरता साहाय्य केले अशा संस्थांसाठी, आणि उरलेले पैसे त्यांच्या आवडीच्या कलाकृती विकत घेण्यासाठी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.



**नोबेल पारितोषिकाचे मानचिन्ह**


श्री. वॅटसन हे पहिलेच नोबेल पारितोषिकाचे जिवंत मानकरी असतील की, ज्यांनी आपले मानचिन्ह

(पृष्ठ क्र. ४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



वर्ष पंधरावे / अंक १२ / डिसेंबर २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | यिंचुआन: एक प्रगतीशील शहर | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | एकेका (ग्रंथा)चं नशीब | श्री. श्रीकान्त बहुलकर | ६ |
| ४) | मेजवानी संस्कृतची | रेवती कुलकर्णी | ११ |
| ५) | नर्मदा परिक्रमा (भाग : ११) | श्री. अरविंद ओक | १३ |
| ६) | व्यक्तिवेध-०१ : ओज-शंकराची कहाणी | श्री. नरेंद्र गोळे | १९ |
| ७) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २३ |
| ८) | पहिले महायुद्ध - एक शतक पूर्ण | प्रा. सुभाष गं. शिंदे | ३१ |
| ९) | भारतीय इंग्रजी साहित्याचे ज्येष्ठ साहित्यकार डॉ. एम. के. नाईक | श्री. प्रशांत धर्माधिकारी | ३५ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# यिंचुआन : एक प्रगतीशील शहर

*चीनमधील यिंचुआन या शहराची माहिती विशद करणारा लेख - संपादक*

किशोरांसाठी आयोजित करण्यात येणारी २७ वी विज्ञान-तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा ऑगस्ट ९ ते १५, २०१२ या कालावधीत चीनमधील यिंचुआन या शहरात आयोजित करण्यात आली होती. चीनच्या उत्तरेला निंक्शिया-हुई या नावाचा एक स्वायत्त प्रांत आहे. या प्रांताच्या राजधानीचे ठिकाण म्हणजे यिंचुआन शहर होय. शांघाय, जीनान, बेजिंग या शहरांना जसे आधुनिक प्रगतीने झाकाळून टाकले आहे तसे या शहराबाबत झालेले नाही. हा प्रांत कृषिप्रधान असून परिसरात पिकविल्या जाणाऱ्या कृषी उत्पन्नाची बाजारपेठ या शहरात होती. त्याचबरोबर आजूबाजूला कोळशाच्या खाणी असल्याने खाण कामगार या परिसरात मोठ्या संख्येने राहतात. शेतीवर उदरनिर्वाह करणारे, खाणीत किंवा वीजनिर्मिती कारखान्यात काम करणारे तसेच सरकारी कार्यालयात काम करणारे असे वेगवेगळ्या प्रकारचे लोक या शहरात राहतात. एकूणच हे मध्यमवर्गीयांचे शहर आहे. त्याच्या खाणाखुणा अनेक ठिकाणी आढळतात.



**शहराचा मध्यभाग**

प्रांताच्या निंक्शिया हुई या नावामधील हुई या शब्दाचा अर्थ मुस्लीम असा आहे. याप्रांतात मुस्लीम लोक मोठ्या संख्येने असल्याने त्यांचा उल्लेख प्रांताच्या नावातच केलेला आहे. त्याचबरोबर राज्याचा प्रमुख मुस्लीमच असेल अशी तरतूद केलेली आहे. साधारणपणे ५ दशकांपूर्वी चीन सरकारने या परिसरात मोठ्या संख्येने हॉन चिन्यांना आणून वसविले. त्याचा परिणाम असा झाला की येथे आता हॉन चिन्यांची संख्या जास्त आहे आणि मुस्लीम बहुसंख्य असलेल्या प्रदेशात ज्या समस्या आहेत त्यांपासून हे शहर मुक्त आहे. सामाजिक एकोपा घडवून आणण्याची ही चांगली युक्ती आहे. याउलट आपल्या देशातील काश्मीर आणि अरुणाचल प्रदेशामध्ये बाहेरच्या प्रांतांतील लोकांनी येऊन वस्ती करण्यास बंदी आहे. त्यामुळे एकोपा साधलाच जात नाही.



**शहरातील रुंद रस्ते**

या शहरात फारसे कारखाने नाहीत; परंतु शहरांचा विकास करण्याची चीन सरकारची जी योजना आहे

आयुष्यात कुठलीच नाती ठरवून जोडता येत नाहीत.

त्यानुसार शहरात नवनवीन कामे करण्यात येत आहेत. सर्वत्र शहरभर ८ लेनचे रस्ते बांधलेले आहेत. प्रत्येक रस्त्यावर विजेच्या खांबांचे वेगळे डिझाइन तसेच प्रकाशयंत्रणेत वेगळेपणा आढळतो. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली असून पादचाऱ्यांना चालण्यासाठी पदपथ बांधले आहेत. त्यामुळे रस्त्यावर वाहुतुकीची कोंडी होत नाही. सध्या शहरातील वाहनांची संख्या लक्षात घेता हे रस्ते खूपच रुंद आहेत असे वाटते. शहरात एक प्रशस्त पटांगण आहे. या पटांगणाला अशा प्रकारे आच्छादन केलेले आहे की त्याची अष्टकोनी आकृती लांबूनसुद्धा आपले लक्ष वेधून घेते.



**अष्टकोनी आकाराचे क्रीडांगण**

विज्ञान प्रदर्शनात सहभागी होणाच्या निमित्ताने आम्हांला चीनमधील वेगवेगळ्या शहरांत जाण्याची संधी मिळाली. या सर्वच ठिकाणी विज्ञान प्रदर्शन भरविण्यासाठी पुरेशी व्यवस्था असल्याचे आढळते. यिंचुआन शहरात तर एक सुसज्ज असे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रच (International Convention Centre) उभारलेले आहे. या प्रदर्शन केंद्रातच २७ व्या विज्ञानतंत्रज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रशस्त असे सभागृह या केंद्रात आहे. या सभागृहात प्रदर्शनीय वस्तू ठेवण्यासाठी मोठी जागा राखून ठेवलेली आहे. शेकडो प्रकल्प एकाच वेळेस येथे ठेवले जाऊ शकतात. हे प्रकल्प दाखविण्यासाठी फलक व टेबलांची चांगली व्यवस्था केलेली होती.



**प्रदर्शनाची मोठी जागा**

मागील काही दशकांमध्ये चीनने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीकडे खूपच लक्ष दिलेले आहे. त्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञान अध्यापनात सुधारणा करण्याबरोबरच समाजामध्ये वैज्ञानिक आणि तांत्रिक साक्षरता कशी येईल याचाही त्यांनी विचार केलेला दिसतो. त्या दृष्टीने जागोजागी विज्ञान केंद्रांची निर्मिती केलेली आहे. यिंचुआन शहरातदेखील एक सुसज्ज असे विज्ञान केंद्र उभारले असून सानथोरांना येथे विनामूल्य प्रवेश दिला जातो. या विज्ञान केंद्राची वैशिष्ट्ये सांगणारा एक वेगळा लख लिहिण्याचा मानस आहे.



**विज्ञान केंद्राची इमारत**

मरण हे अपरिहार्य आहे, त्याला भिऊ नका.

निंक्शिया हुई प्रांताला फार प्राचीन असा इतिहास आहे. या इतिहासाची माहिती देण्यासाठी प्रांतीय स्तरावरचे एक वस्तुसंग्रहालय या शहरात उभारले आहे. हे संग्रहालय पूर्वी एका लहानशा इमारतीत होते; परंतु इ.स. २००८ पासून ते एका प्रशस्त अशा नवीन इमारतीत हलविण्यात आले. निंक्शिया हुई प्रांताची स्थापना इ.स. १९५८ मध्ये झाली. त्या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रांताला एक सुसज्ज असे वस्तुसंग्रहालय बांधून देण्यात आले. या वस्तुसंग्रहालयात खूप वस्तू ठेवलेल्या आहेत. याबद्दल एक स्वतंत्र लेख लिहिलेला आहे.



**प्रांतीय वस्तुसंग्रहालय**

यिंचुआन शहराच्या आजूबाजूचा परिसर तसा रेताडच आहे. या जमिनीत व्होल्फबेरी नावाची झाडे चांगली वाढतात. म्हणून येथील शेतकरी या झाडांची लागवड करून जोपासना करतात. या झाडांना लागणारी फळे लाल रंगाची असून किसमिससारखी मऊ असतात. या परिसरात या फळांना चांगलीच मागणी आहे. बाजारात ती उपलब्ध असतात. तरीही पर्यटकांना या फळाची माहिती व्हावी यासाठी एक सुंदर असे संग्रहालय उभारलेले आहे. येथे गेल्यावर त्या वनस्पतीबद्दल माहिती तर देतातच, त्याचबरोबर या फळांचा उपयोग करून कोणकोणते खाद्यपदार्थ बनवितात याचीदेखील माहिती देतात. हे संग्रहालय म्हणजे खरेतर एक विक्री केंद्रच आहे. प्रदर्शनीय वस्तू पाहून आपण दुकानात शिरतो. तेथून काहीतरी खरेदी करूनच आपण बाहेर पडतो. आपल्याकडे पिकणाऱ्या वस्तूंची जाहिरात आणि विक्री करण्याची ही कल्पना खरोखरच चांगली आहे.



**व्होल्फ बेरी संग्रहालय**

शहराच्या आजूबाजूला फारसे कारखाने नाहीत; परंतु शहराच्या जवळच चित्रपटनगरी आहे. भारताप्रमाणेच चीनमध्येदेखील मोठ्या प्रमाणावर चित्रपटांची निर्मिती होते. या चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी योग्य जागा लागते. या शहराजवळ तशी जागा असल्याने तेथे चित्रनगरी निर्माण करण्यात आलेली आहे. चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा तेथे पुरविल्या आहेत. त्यामुळे चित्रपटनिर्मात्यांना फारशी धावपळ न करता चित्रपट तयार करता येतो.



**चित्रनगरीचे प्रवेशद्वार**

(पृष्ठ क्र. ३० वर)

# एकेका (ग्रंथा)चं नशीब

*''वृत्तमालास्तुति'' या ग्रंथाचे महत्त्व विशद करणारा लेख - संपादक*

एखादा पंडित ग्रंथ लिहितो, तेव्हा त्याला कल्पनाही नसते की त्या ग्रंथाचं नशीब काय असेल! कुणी तो वाचेल का? कोणी त्यावर टीका लिहील का? त्या ग्रंथाला विद्वानांची मान्यता लाभेल का? पण तरी लोक लिहितात. भवभूतीनं म्हटल्याप्रमाणे ''उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी''[१] असा प्रचंड आशावाद असतो अशा लेखनामागे.

ज्ञानश्रीमित्र ह्या विक्रमशील महाविहार विद्यापीठामधल्या थोर बौद्ध पंडिताच्या ''वृत्तमालास्तुति'' ह्या ग्रंथाचं नशीबही असंच काहीसं असावं. ह्या पंडितानं विपुल ग्रंथरचना केली. त्या ग्रंथांची हस्तलिखितं बौद्ध धर्मामागोमाग भारताबाहेर गेली. तो धर्म जसा भारतातून- हिमालयीन भाग वगळता - हद्दपार झाला तशी बौद्ध हस्तलिखितंही नाहीशी झाली. महापंडित राहुल सांकृत्यायन ह्यांनी संस्कृत हस्तलिखितांचा शोध घेत चार वेळा तिबेटची यात्रा केली, मोठ्या हालअपेष्टा सोसून त्यांनी तिथल्या अनेक संस्कृत हस्तलिखितांची छायाचित्रं घेतली आणि तो अमूल्य ठेवा विद्वानांच्या पुढच्या अनेक पिढ्यांसाठी पाटण्यातल्या एका संस्थेस सुपूर्द केला. त्या छायाचित्रांमध्ये ज्ञानश्रीमित्रांच्या बौद्ध तत्त्वज्ञानावरील ग्रंथांच्या हस्तलिखितांची छायाचित्रंही होती. अनंतलाल ठाकूर ह्या श्रेष्ठ विद्वानानं ''ज्ञानश्रीमित्रनिबंधावली'' ह्या नावानं ते ग्रंथ प्रकाशित केले आहेत. पण ज्ञानश्रीमित्रानं रचलेल्या ''वृत्तमालास्तुति'' ह्या ग्रंथाचं नशीब मात्र काही वेगळंच होतं. राहुल सांकृत्यायन ह्यांना तो ग्रंथ त्यांच्या तिबेटच्या यात्रांमधे सापडला नसावा. तो सापडायला आणखी काही वर्षं जावी लागली.

मिखाएल हान हा तरुण जर्मन संशोधक. मानसशास्त्राचा पदवीधर. योगायोगानं संस्कृत भाषेच्या अभ्यासाकडे वळला. मग त्यानं तिबेटी भाषाही आत्मसात केली. आता पीएच्.डी. करावी असं त्याच्या मनानं घेतलं. एखाद्या अप्रकाशित ग्रंथाचं संपादन करावं असं ठरवून त्यानं शोधायला सुरुवात केली. तसा शोध घेत असताना त्याचं लक्ष संस्कृत ग्रंथांच्या तिबेटी अनुभावाकडं गेलं. ज्ञानश्रीमित्रानं रचलेल्या ''वृत्तमालास्तुति'' ह्या ग्रंथाचा तिबेटी अनुवाद वाचत असताना त्याला जाणवलं की तो ग्रंथ आगळावेगळा आहे; पण संस्कृत भाषेच्या विद्वानांना त्या ग्रंथाचं नावही ठाऊक नाही. संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासातही त्याचा उल्लेख नाही. त्या मूळ संस्कृत ग्रंथाचं हस्तलिखित कुठं आहे का तेही माहीत नाही. तो ग्रंथ म्हणजे एक स्तोत्र आहे. मंजुश्री ह्या बौद्ध देवतेची (बोधिसत्त्वाची) स्तुती आहे; पण त्याचबरोबर तो संस्कृत छंद शास्त्रावरील एक ग्रंथही आहे. एकाच श्लोकामध्ये देवतेची स्तुती आणि तो श्लोक ज्या छंदात आहे त्या छंदाचं नाव आणि यतीची माहितीही श्लेषाचा वापर करून गुंफली आहे. असा अजब प्रकार इतर कोणत्याही स्तोत्रात किंवा छंद शास्त्रावरच्या ग्रंथात आढळत नाही. असे थोडेथोडके नव्हे तर १५४ श्लोक त्या ग्रंथात आहेत. त्यांपैकी १५० श्लोक प्रत्येकी वेगवेगळ्या वृत्तांमध्ये रचलेले आहेत. प्रत्येक श्लोकात शेवटच्या पादात त्या त्या वृत्ताचं नाव गुंफलं आहे आणि तसं करताना मंजुश्री बोधिसत्त्वाच्या स्तुतीकडेही त्या नावाचा अर्थ घेता येईल हे पाहिलं आहे. पण प्रत्येक वृत्ताचं नाव देवतेच्या स्तुतीसाठी कसं घेता येणार? कारण काही वृत्तनामं तर निरर्थकच वाटतात. कोशामध्येही ''एका

वृत्ताचं नाव'' यापलीकडे त्या शब्दांचा वेगळा काही अर्थ दिलेला नाही. दोधक, तोटक, नर्कुटक अशी अनेक वृत्तनामं उदाहरणादाखल सांगता येतील. अशा वेळी मग अनेक युक्त्या योजाव्या लागतात. ज्ञानश्रीमित्रांनी अशा अनेक युक्त्या वापरलेल्या आहेत. ही सगळी छंद शास्त्रीय रचना त्या पंडितानं बहुधा छंद म्हणून केली असावी. ह्या रचनेत प्रतिभा आणि विद्वत्ता यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो.

प्रा. हान ह्यांनी ह्या ग्रंथाचं संपादन करायचं ठरवलं. ते एक मोठं आव्हानच होतं. मूळ संस्कृत ग्रंथ उपलबध नाही. जरी त्याचा तिबेटी भाषेतला अनुवाद शब्दशः करण्यात आला होता असं मानलं तरी शब्दसंपदा, अलंकार, त्या त्या वृत्ताची माहिती हे सगळं कसं समजणार? त्या काळात संस्कृत आणि तिबेटी भाषेवर त्यांचं तेवढं प्रभुत्वही नव्हतं. पीएच.डी.च्या मार्गदर्शकांनाही ह्या ग्रंथाचा परिचय नव्हता. कोण मदत करणार? पण तरीही हान यांनी ते काम हाती घेतलं. नेपाळमध्ये काही काळ वास्तव्यास असताना एकदा रात्री झोप येत नव्हती म्हणून त्यांनी त्या तिबेटी ग्रंथाचं वाचन सुरू केलं. तिबेटी अनुवादावरून त्या त्या वृत्ताचं नाव शोधून काढायला सुरुवात केली. एखादं कोडं सोडवावं तसा तो प्रकार होता. त्या रात्रीत त्यांनी सगळ्या वृत्तांची नावं शोधून काढली. पुढं कालांतरानं जेव्हा मूळ ग्रंथ मिळाला, तेव्हा आपण शोधलेली सगळीच्या सगळी वृत्तनामं बरोबर आहेत असं त्यांना दिसलं. संस्कृत ग्रंथ आणि त्यांच्या तिबेटी अनुवादांचा जो काही अभ्यास मी काही वर्षं केला आहे त्यावरून मी सांगतो की हे अद्‌भुत आहे. हान यांची तर्कशक्ती आणि प्रतिभा यांना खरोखर दाद दिली पाहिजे.

पीएच.डी. साठी हे संशोधन केलं, पदवी मिळाली, तरी हान यांचं त्या ग्रंथाचं संशोधनकार्य संपलं नाही. मूळ संस्कृत ग्रंथ आणि त्यावरची टीकाही मिळाली. त्यानंतर जवळजवळ चाळीस वर्षं इतर व्याप सांभाळत इतर अनेक ग्रंथांवर विपुल संशोधनकार्य करत असताना, अध्यापन आणि विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मार्गदर्शन करत असताना, विभागप्रमुख म्हणून प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडत असताना वृत्तमालास्तुतीवरचं त्यांचं संशोधन चालू होतंच. असं करत करत अगदी अलीकडे गेल्या दोन वर्षांत ज्ञानश्रीमित्रांची ''वृत्तमालास्तुति'' आणि शाक्यरक्षितविरचित ''वृत्तमालास्तुतिविवृति'' ही त्या ग्रंथावरील टीका ह्या दोन्ही ग्रंथांचं चिकित्सापूर्ण संपादन करून त्यांनी ते जपानमधल्या एका संशोधनकालिकात दोन भागांमध्ये प्रसिद्ध केलं.

हान यांचा आणि माझा परिचय तसा २५ वर्षांहूनही जास्त काळ होता. कधीकधी काही पत्रव्यवहार होत असे. मी Central University of Tibetan Studies या सारनाथ येथील संस्थेत काम करीत असताना जानेवारी २०१० मध्ये एका कार्यशाळेसाठी त्यांना आणि इतर चार परदेशी संशोधकांना निमंत्रित केलं. त्या वेळी पुण्याहून कार्यशाळेसाठी आलेल्या लता-महेश देवकर यांच्याशी त्यांचा परिचय झाला. लतानं पीएच.डी. साठी सादर केलेला प्रबंध पाहून ते प्रसन्न झाले आणि त्यांनी तो प्रसिद्ध करण्याची तयारी दाखवली. पुढं ते काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यासाठी Alexander von Humboldt Foundation ची शिष्यवृत्ती मिळवून जर्मनीस जायची संधी तिला मिळाली. आम्ही हानना पुण्याला यायचं निमंत्रण दिलं. त्यांनीही ते मान्य केलं आणि पुण्याला येऊन ''कप्फिणाभ्युदय'' या संस्कृत महाकाव्याचा इंग्रजी अनुवाद करण्यासाठी एक कार्यशाळा घेतली. त्या कार्यशाळेत आमच्याबरोबर काही मान्यवर विद्वानही सहभागी झाले. त्या ग्रंथासंबंधीचं त्यांचं संशोधन हा एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. वस्तुतः त्याच सुमाराला त्यांना कर्करोग झाला असल्याचं निदान झालं होतं; पण काही सुधारणा होती. त्यांच्या पुण्यातल्या वास्तव्यात लता, महेश आणि मी त्यांच्याबरोबर चर्चा केली आणि

त्यांच्याबरोबर काम करायचं ठरवलं. आम्ही नोव्हेंबर २०१२, एप्रिल-जून २०१३ आणि एप्रिल-जून २०१४ या काळात जर्मनीमध्ये हान यांच्याबरोबर ''वृत्तमालास्तुति'' आणि त्या ग्रंथावरील टीका यांचं वाचन केलं. ''कप्फिणाभ्युदय'' महाकाव्याच्या काही सर्गांचा अनुवादही झाला. आमच्या शेवटच्या वास्तव्यात त्यांचा कर्करोग बळावला. तरीही त्यांनी आमच्याबरोबर काम केलं. अशक्तपणा जाणवत होता, प्रकृतीत चढ-उतार होत होते; पण त्यांची जिद्द आणि उत्साह तसूभरही कमी झाला नाही. ''दिसो लागे मृत्यू परि न भिववू तो मज शके'' या ओळीची आठवण त्यांच्याकडे पाहून येत असे. आमचं काम चालू असताना इतरही कामं चालू होतीच. आपल्या आयुष्याचे हे शेवटचे दिवस आहेत हे समजून घेऊन त्यांनी शांतपणे निरवानिरव सुरू केली होती. लताबरोबरचं तिच्या प्रबंधात सुधारणा सुचवण्याचं आणि त्या बारकाईनं तपासण्याचं जिकिरीचं, किचकट कामही चालू होतंच. अकराव्या शतकातल्या सुभूतिचंद्र ह्या बौद्ध पंडितानं रचलेली ''कविकामधेनु'' ही अमरकोशावरची टीका. एखाद्या ज्ञानकोशाचं स्वरूप असलेल्या त्या ग्रंथाच्या नेवारी आणि ग्रंथ या लिप्यांतली दोन अपूर्ण आणि कामलीची भ्रष्ट हस्तलिखितं आणि त्या टीकेचे तितकेच भ्रष्ट तिबेटी अनवुाद ह्यांच्या साहाय्यानं त्या टीकेचं चिकित्सापूर्ण संपादन हे एक आव्हानच होतं. लतानंही आपल्या तिथल्या वास्तव्याचा आणि हान यांच्या मार्गदर्शनाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. प्रचंड परिश्रम करून हान यांचं समाधान होईल अशा पद्धतीनं काम केलं. तिचा सुधारित प्रबंध त्यांच्या संशोधन-प्रकाशन मालिकेत प्रसिद्ध व्हावा आणि तो प्रकाशित स्वरूपात त्यांना पहायला मिळावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्या प्रतिष्ठित संशोधन-प्रकाशन-मालिकेत ग्रंथ प्रकाशित झाला. तो सन्मान मिळवणारी डॉ. लता महेश देवकर ही एकमेव भारतीय आहे. त्यांच्या मृत्यूपूर्वी एक महिना अगोदर ती प्रत त्यांच्या हाती पडली, याचा त्यांना कोण आनंद झाला होता. त्यांनी उद्गार काढले, ''हा माझ्या प्रकाशन मालिकेतला एक अलंकार आहे!''

''वृत्तमालास्तुति'' ह्या हान यांच्या आवडत्या ग्रंथाचं त्यांच्यासह वाचन हा एक अविस्मरणीय अनुभव होता. त्या वाचनाच्या निमित्तानं कितीतरी गोष्टी समजल्या, शिकायला मिळाल्या. अलौकिक प्रतिभेची देणगी, अखंड परिश्रमानं संपादन केलेली जगन्मान्य विद्वत्ता, याबरोबरच दैवाची साथही त्यांना लाभली होती. विद्वानांना अज्ञात असलेल्या आणि न गवसलेल्या अनेक ग्रंथांची हस्तलिखितं त्यांनी प्रकाशात आणली. त्या शोधांची कहाणी, त्या ग्रंथांच्या अभ्यासाच्या समस्या, इतर अनेक विद्वानांचं संशोधन आणि त्यांचं मूल्यमापन, संस्कृत आणि तिबेटी भाषेसंबंधीची निरीक्षणं - काय काय म्हणून सांगावं! ते सगळं त्यांच्या तोंडून ऐकताना आम्हांला जो अपूर्व आनंद मिळत असे, त्याची तुलना दुसऱ्या कशाशीही करता येणं कठीण आहे. संस्कृत छंदशास्त्राची त्यांची समज तर भारतीय पारंपरिक श्रेष्ठ विद्वानाच्या तोडीची होती. वृत्तमालास्तुतिच्या वाचनाच्या निमित्तानं त्यांचा त्या विषयाचा चाळीस वर्षांचा अनुभव प्रकट होत होता. २०१३ सालच्या आमच्या जर्मनीतल्या वास्तव्यात त्या ग्रंथामधल्या १५४ पैकी पहिल्या १०० श्लोकांचं त्यावरल्या टीकेसह वाचन पुरं झालं. तेवढ्या भागाचं संपादन करून तो निबंधाचा पहिला भाग त्यांनी जपानमधल्या एका संशोधनकालिकात प्रसिद्ध केला. २०१४ सालच्या मुक्कामात मात्र त्यांच्या आजारपणामुळे आमच्या त्यांच्याशी भेटी कमी झाल्या. त्यांना त्या निबंधाचा दुसरा भाग प्रसिद्ध करायचा होता. तत्पूर्वी त्यांना प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागाचं पुन्हा एकदा वाचन व्हायला हवं होतं. टीकेचं मूळ हस्तलिखित वाचून संपादित भाग पुन्हा तपासायला हवा होता. हे काम करणं प्रकृति-अस्वास्थ्यामुळे त्यांना कठीण होतं. त्यांनी ते माझ्यावर

सांपवलं. ती मोठीच जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली. मग मी सारा वेळ त्या कामाला देऊन ते पुरं केलं. त्यांच्याकडे त्या सुधारणा पाठवताना मी त्या पुन्हापुन्हा तपासत असे. दुसऱ्या भागामधल्या मी सुचवलेल्या बहुतेक दुरुस्त्या त्यांनी मान्य केल्या आणि तो सुधारित स्वरूपातला निबंध प्रकाशनासाठी जपानला पाठवला. पहिल्या भागाच्या दुरुस्त्या पाहणं मात्र त्यांना जमू शकलं नाही. त्या दुरुस्त्या आता माझ्याकडे पडून आहेत. ते वाचन करताना त्यांनी सुचवलं की शाक्यरक्षितानं आपल्या टीकेमध्ये व्याकरणाची जी चर्चा केली आहे, त्या चर्चेचा परामर्श घेणारा निबंध आम्ही तिघांनी मिळून लिहावा. मग तो आम्ही पुरा केला आणि त्या संशोधनकालिकाकडे पाठवला. हान यांच्या निबंधाचा दुसरा भाग आणि आमचा निबंध असे दोन्ही निबंध आता प्रसिद्ध झाले आहेत. ह्या अद्‌भुत ग्रंथाचा भारतीय विद्वानांना परियच व्हावा आणि अभ्यासासाठी तो सहज उपलब्ध व्हावा म्हणून त्या ग्रंथाची देवनागरी लिपीतली भारतीय आवृत्ती आम्ही तयार करून प्रसिद्ध करावी असंही त्यांनी सुचवलं. ते काम आम्ही हाती घेतलं असून तो लवकरात लवकर प्रसिद्ध करायचा आमचा मानस आहे. तो ग्रंथ प्रा. हान यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध होईल. ती त्यांना उचित अशी श्रद्धांजली असेल.

''वृत्तमालास्तुति'' ह्या ग्रंथाचं पुण्यामधले अभ्यासक आणि विद्यार्थी यांच्यासह वाचन करावं अशी माझी इच्छा आहे आणि ती फलद्रूप होईल अशी आशा मी बाळगून आहे. तत्पूर्वी अनपेक्षितपणे ती संधी चालून आली. इथे ऑक्सफर्डला आल्यावर माझ्या नियोजित व्याख्यानांसंबंधी चर्चा करताना Oxford Centre for Hindu Studies चे संचालक प्रा. गॅव्हिन फ्लड (Gavin Flood) ह्यांनी विचारलं की तू एखादा विशेष वर्ग घेशील का? मग मी सुचवलं की सामान्यतः ज्या ग्रंथाचा अभ्यास केला जात नाही, पण जो महत्त्वाचा आहे अशा एखाद्या ग्रंथाच वाचन करावं, असं मला वाटतं. मग मी ''वृत्तमालास्तुति'' ह्या ग्रंथाची कहाणी त्यांना ऐकवली. अशा ग्रंथाचं वाचन करायची संधी एरवी कधी आणि कशी मिळणार? त्यांना ती कल्पना आवडली. मग दर सोमवारी आयोजित करण्यात येणाऱ्या Sanskrit Lunch च्या वेळी त्यांनी ती घोषणा केली. मी थोडक्यात त्या ग्रंथाची माहिती देऊन त्याची पूर्वपीठिका विशद केली. लगोलग मला एक प्राध्यापक आणि एक विद्यार्थी अशा दोघांची इ-मेल मिळाली. त्यांना त्या वाचनात सहभागी व्हायचं होतं.

सोमवार दि. २७ ऑक्टोबर या दिवशी दुपारी दोन वाजता या ग्रंथवाचनाचा पहिला दिवस. त्यापूर्वी पाच मिनिटं प्रा. गॅव्हिन फ्ड माझ्या खोलीत आले. ते म्हणले, ''आनंदाची बातमी! तुझ्या वर्गाला सहा जण आले आहेत आणि मी सातवा.'' मला अतिशय आनंद झाला. कारण ऑक्सफर्डमध्ये संस्कृत ग्रंथाच्या विशेष वाचनाला एवढे जण असणं अवघडच! इथली अभ्यासाची पद्धत काहीशी वेगळी आहे. बहुतेक विद्यार्थी आपापला विषय, ग्रंथ निवडतात आणि शिक्षकांबरोबर वाचतात. माझ्याकडेही असे तीन विद्यार्थी सध्या येताहेत. या कारणामुळे आमच्या, अभ्यासक्रमाचा भाग नसलेल्या ग्रंथवाचनात किती जण सहभागी होतील, त्याचा अंदाज करणं कठीण होतं. त्या सहवाचनात एम.ए.पीएच.डी. चे विद्यार्थी आणि संस्कृत-पालीचे एक प्राध्यापक L. S. Cousins सहभागी झाले. ते वाचन अतिशय आनंददायक झालं. इथून पुढे केवढा भाग वाचून होईल, ते आत्ता सांगणं कठीण आहे. माझं इथलं वास्तव्यही थोड्या काळापुरतंच आहे. ह्या ग्रंथाचं संपूर्ण सहवाचन करणं पुण्यात शक्य आहे. गेली जवळजवळ हजार वर्षं अज्ञातवासाची शिक्षा भोगणाऱ्या ह्य ग्रंथाला त्या अज्ञातवासातून मुक्त करायचं महान कार्य प्रा. हान ह्यांनी केलंय. आता ज्ञानश्रीमित्राला न्याय देणारे, त्याच्या या ग्रंथाचा अभ्यास करणारे अनेक समानधर्मही उदयाला येतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे. एकेका (ग्रंथा)चं नशीब असतं ते असं!

---

सर्वच प्रश्न सोडवून सुटत नाहीत, काही सोडून दिले की आपोआप सुटतात.

ह्या ग्रंथाचा जर्मनीत २०१३ साली मारबुर्गला राहून अभ्यास करत असताना बुद्धपूर्णिमेच्या दिवशी ज्ञानश्रीमित्र आणि त्यानं रचलेली वृत्तमालास्तुती ह्यांचा गौरव करणारा एक श्लोक मला सुचला. तो श्लोक आणि त्याचा अनुवाद देऊन ही कथा पुरी करतो.

छन्दःशास्त्रे रतिश्चेत्तदधिगमसमं देवतासंस्तवेऽपि
प्रज्ञालोकावभासास्पदमिह रचना सेव्यतां का भवद्भिः।
ज्ञानश्रीमित्रजैत्रप्रवचनपटहोद्दामदिग्धामशब्द-
त्रस्तध्वस्तप्रचाराखिलबुधशरणं वृत्तमालास्तुतिः सा॥

"जर तुम्हांला छंदशास्त्रामध्ये रस असेल, आणि त्या शास्त्राचा अभ्यास करत असतानाच एखाद्या देवतेची स्तुती वाचण्यातही रस असेल, तर (ग्रंथकाराच्या) प्रज्ञेचा प्रकाश सर्वत्र फैलावणाऱ्या अशा कोणत्या बरे रचनेचा तुम्ही अभ्यास कराल? ज्ञानश्रीमित्राच्या (विद्वत्तापूर्ण) प्रवचनरूपी नगाऱ्याच्या, सर्व दिशा दुमदुमून टाकणाऱ्या बेबंद जयघोषानं घाबरलेल्या विद्वानांचा संचार थांबला आणि ते सगळे (ज्ञानश्रीमित्राच्या) आश्रयाला आले, (हे जिच्यामुळे घडलं), ती ही वृत्तमालास्तुति होय."

[१]"या जगात माझ्या स्वभावधर्माशी जुळणाऱ्या स्वभावाचा कुणी एखादा जन्माला येइल, किंवा असेलही. काळ अपार आहे, आणि पृथ्वी विशाल." भवभूति, मालतीमाधव, १.६.

**श्रीकान्त बहुलकर**
ऑक्सफर्ड

●●●

## *दिशा संपर्क दूरध्वनी*

**०२२-२५४२ ६२७०**

## *अनैसर्गिक स्पर्धा आणि हव्यास*

जास्तीचा हव्यास हा खूप वेळा प्रगतीशी जोडलेला असतो. जगात अजूनही अनेक लोक अर्धनग्न आहेत तर कुपोषणाचेही अनेक बळी आहेत. तरीही बहुतेक विकसनशील देशांमध्येही वस्त्रांचा उपयोग हा गरजेपेक्षा जास्त आणि अन्नाचीही नासाडी मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. जगात चीन हा सर्वांत अधिक लोकसंख्येचा देश आहे. तत्त्वतः तेथे साम्यवादी सरकार असले तरी सर्व अर्थव्यवहार मात्र भांडवलदारी म्हणजे बाजार अर्थकारणावर चालू आहेत. चीनमध्ये सध्या स्वास्थ्य सेवा आणि शुश्रूषालायांच्या संख्येमध्ये बेसुमार वाढ होत आहे. याकरता हवा असलेला प्रशिक्षित सेवकवर्ग मात्र त्या प्रमाणात उपलब्ध नाही. साहजिकच यामुळे नागरिकाला या सेवांकरता अवाच्यासवा पैसे मोजावे लागतात आणि या सेवांचा दर्जा मात्र सुमार असतो. ४००० हून अधिक खाटांची उपलब्धता असलेली सुमारे १० शुश्रूषालये आज चीनमध्ये आहेत. प्रगत राष्ट्रांमध्येही एवढी मोठी शुश्रूषालये आज नाहीत. चीनच्या राष्ट्रीय स्वास्थ्य आणि कुटुंब नियोजन मंडळाने या बेसुमार वाढीबद्दल चिंता व्यक्त करून त्यावर निर्बंध आणले आहेत. आपल्याकडेही आज याची लागण झालेली दिसते. शिक्षण असो वा स्वास्थ्य सेवा, संख्यात्मक वाढ आणि दर्जा यांचे नाते नेहमीच व्यस्त असते. म्हणूनच कुठल्याही गोष्टींमध्ये अनैसर्गिक स्पर्धा आणि हव्यास हा धोकादायकच असतो.

**संपादक**

# मेजवानी संस्कृतची

*संस्कृत भाषेची महती विशद करणारा लेख - संपादक*

पिढ्यान्‌पिढ्या संचित अनुभव, तरल कविकल्पना यांचा खजिना असणारी संस्कृत भाषा... नावातूनच संस्कृतीशी, संस्कारांशी नाते जोडणारी... मौलिक ज्ञानाचा भरजरी वारसा जपणारी... तरीही गैरसमजामुळे क्लिष्ट वाटणारी! उच्चारणपद्धती, वाक्यरचना, शब्दयोजना यांमुळे संस्कृत भाषा अत्यंत प्रभावी व कर्णमधुर वाटते. मात्र तरीही संस्कृतची अनेकांना धास्ती वाटते. खरेतर असं असावयाच काही कारण नाही. संस्कृत भाषेचे दालन एवढे समृद्ध आहे की ती आजच्या काळातही समर्थ व्यवहारभाषा, ज्ञानभाषा होऊ शकते. संस्कृतात बऱ्याच कल्पना अगदी नेमकेपणाने व्यक्त करता येतात. योग्य अभ्यास आणि सरावाने संस्कृत भाषा अवघड वाटेनाशी होते. अनेक संस्थांनी आपल्या या प्राचीन भाषेचे - 'गीर्वाणवाणीचे' महत्त्व जाणून आपली घोषवाक्ये संस्कृतात योजली आहेत. उदाहरणार्थ -

१) 'अहर्निशं सेवामहे।' - टपाल खाते

२) 'योगक्षेमं वहाम्यहम्।' - आयुर्विमा निगम

३) 'सत्यमेव जयते।' - राजमुद्रा

४) 'नभः स्पृशं दीप्तम्।' - वायुसेना

५) 'शं नो वरुणः।' - नौदल

६)'प्रज्वलितो ज्ञानमय प्रदीपः।'- आपले महाविद्यालय

अशा प्रकारे संस्कृत साहित्यात उद्‌बोधन करणारे श्लोक विपुल प्रमाणात आहेत, हे सर्वश्रुत आहे मात्र संस्कृत वाङ्मयात वाचकांचे दर्जेदार मनोरंजन करण्याचीही क्षमता आहे. हेच सिद्ध करणारे काही निवडक, रंचक श्लोक पुढे देते -

१) सर्वप्रथम एका संस्कृत कवीने ब्रह्मदेवाला केलेली कळवळीची तरी मजेशी विनंती पाहू या.

इतरतापशतानि वितर यथेच्छया
तानि सहे चतुरानन।
अरसिकेषु कवित्व निवेदनं
शिरसि मा लिख मा लिख मा लिख॥

हे ब्रह्मदेवा, तुझ्या इच्छेनुसार इतर शेकडो दुःखे तू मल दे, ती मी सहन करीन. मात्र अरसिकांमध्ये काव्यनिवेदन करण्याचे (दुर्दैव) माझ्या कपाळी (नशिबी) लिहू नकोस, लिहू नकोस, मुळीच लिहू नकोस!

२) संस्कृत व्याकरणातील मौज व्यक्त करणारा हा श्लोक
षष्ठीतत्पुरुषं रामो बहुव्रीहिं महेश्वरः।
रामेश्वरपदे ब्रह्मा कर्मधारयमब्रवीत्॥
एकदा नारदाने 'रामेश्वर' शब्दाचा विग्रह विचारला तेव्हा श्रीरामाने सांगितले - रामस्य ईश्वरः। - षष्ठी तत्पुरुष समास, श्रीशंकराने सांगितले - रामःईश्वरः(स्वामी) यस्य सः। - बहुव्रीहि, ब्रह्मदेवाने सांगितले - रामःच ईश्वरश्च। - कर्मधारय.

३) पुढील काही श्लोकांमधून सभोवतालच्या गोष्टींवर कवींनी केलेल्या उपरोधिक भाष्यामुळे विनोदनिर्मिती होते-

उष्ट्राणां च गृहे लग्नं गर्दभः मन्त्रपाठकः।
परस्परं ते प्रशंसन्ति 'अहो रूपम् अहो ध्वनिः॥

उंटाच्या घरी लग्नसमारंभात मंत्र म्हणायला गाढव होते. त्यांनी एकमेकांची स्तुती केली. उंट गाढवाला

म्हणाला. ''किती मधुर आवाज!'' तर गाढव उंटाला म्हणाले, ''किती सुंदर, देखणं रूप!''

४) मलिनैर लकैरेतैः शुक्लत्वं प्रकटीकृतम्।
तद्द्रोषात् इव निर्याता वदनाद्रदनावलिः॥

या काळ्या केसांनी शुभ्रपणा प्रकट केला. त्या रागानेच जणू काही तोंडातील दातांची रांग निघून गेली. (म्हातारपण!)

५) असारे खलु संसारे सारं श्वशुरमन्दिरम्।
हरो हिमालये शेते हरीः शेते महोदधौ॥

निरर्थक अशा या जगात सासऱ्याचे घर हे खरोखर सुखाचे आहे. म्हणूनच शंकर हिमालयावर झोपतो व विष्णू महासागरात शयन करतो!

६) आकर्ण्य आम्रफलस्तुतिं जलमभूत तत् नारिकेलान्तरम्।
प्रायः कङ्टकितं तथैव पनसं जातं द्विधा उर्वारुकम्।
आस्ते अधोमुखम् एव कादलम् अलं द्राक्षफलं क्षुद्रताम्।
श्यामत्वं वत जाम्बवं गतम् अहो मात्सर्य दोषात् इह॥

आंब्याच्या फळाची स्तुती ऐकून नारळाच्या काळजाचे पाणी झाले, फणसाच्या अंगावर काटे आले, काकडीचे दोन तुकडे झाले, केळ्याने खाली मान घातली, द्राक्ष सुकून लहान झाले आणि जांभूळ काळवंडून गेले. खरोखर हा मत्सराचाच दोष!

७) पुढील काही श्लोक वाचकांच्या बुद्धीला ताण देतात आणि विचारशक्तीचा कस बघतात. त्यांचा प्रहेलिका, कूटप्रश्न या प्रकारांत समावेश होतो. तर आता कोडी सोडवू या.

वृक्षस्याग्रे फलं दृष्टं फलाग्रे वृक्षमेव च।
अकारादि सकारान्तं यो जानाति स पण्डितः॥

झाडाच्या टोकावर फळ आणि फळाच्या टोकावर झाड दिसते. 'अ' या अक्षराने सुरुवात तर 'स' अक्षराने शेवट होणारी ती वस्तू जो जाणतो तोच खरा विद्वान!
उत्तर - अननस

८) वृक्षाग्रवासी न च पक्षिराजः।
तृणं च शय्या न च राजयोगी।
सुवर्णकायो न च हेमधातुः।
पुंसश्च नाम्ना न च राजपुत्रः॥

झाडाच्या शेंड्यावर राहतो, पण पक्षिराज (गरुड) नव्हे. गवताचा बिछाना आहे, मात्र कुणी सिद्धपुरुष नव्हे. त्याचे शरीर सोनेरी आहे, पण सोने हा धातू नाही. पुल्लिंगी नाव आहे, मात्र कुणी राजपुत्र नाही.
उत्तर - आंबा

९) 'आशु' शब्दस्य अन्तेन 'कलायाः' प्रथमेन च।
विहगोयो भवेत् तस्य वर्णं शीघ्रं निवेदय॥

'आशु' (लगेच) शब्दाचे शेवटचे अक्षर आणि 'कला' या शब्दाचे प्रथम अक्षर घेऊन जो पक्षिवाचक शब्द तयार होईल, त्याचा रंग चटकन सांगा पाहू!
आ<u>शु</u>-<u>क</u>ला-पोपट-रंग- हिरवा

१०) भोजनान्ते च किं पेयम्
जयन्तः कस्य वै सुतः।
कथं विष्णुपदं प्रोक्तम्
तक्रं शक्रस्य दुर्लभम्॥

भोजनानंतर काय प्यावे ? जयंत कुणाचा मुलगा? विष्णूचे स्थान कसे आहे? असे म्हटले आहे, इंद्राला ताक दुर्लभ.

या विसंगतिपूर्ण श्लोकाचा अर्थ घेताना पहिल्या ३ चरणांची उत्तरे शेवटच्या चरणात आलेली आहेत.

भोजनानंतर काय प्यावे - ताक
जयंत कुणाचा मुलगा - इंद्राचा
विष्णूचे स्थान कसे आहे - दुर्लभ

११) तातेन कथितं, ''पुत्र, पत्रं लिख मम आज्ञया।''
न तेन लिखितं पत्रं पितुः आज्ञा न लङ्घिता॥

(पृष्ठ क्र. १८ वर)

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ११**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ३५ वा दरियापुरा - मोरिया (१५ किमी.)**
**दरियापुरा-चाणोद-कन्नाराड-कुबेर-वडिया**

सकाळी अंधारातच (पौर्णिमा नुकतीच झालेली होती त्यामुळे चंद्रप्रकाश होता.) ६॥। वाजता आश्रम सोडला. डांबरी रस्ता फक्त. तसा फक्त आश्रमाकडे पुलापासून जाण्यासाठी होता. मातीचा रस्ता लागला. सिसावदची आठवण यावी इतकी पाऊल पाऊल धूळ/रेती होती.

तीन तासांनी चाणोद हे मोठे गाव आले. पहिला चहा इथेच घेतला. काल सकाळी कंजेण गावातून निघालो तेव्हा बाभळींमधून मोराचा केकारव आला, पण मोर दिसला मात्र नव्हता. कंजेणपासून पोपट बहुसंख्येने दिसायला लागले आहेत. बद्रिकाश्रमात याव्यतिरिक्त अनेक पक्ष्यांची उपस्थिती विशषतः संध्याकाळी जाणवली. बुलबुल, कोकीळ, पोपट, मैना, चिमण्या, खारी, कलरव/कलक गोंगाट करणारे सातभाई, सकाळी नदीवरून उडत जाणाऱ्या पाणकोंबड्यांच्या विविध आकार धारण करणाऱ्या रांगा, नदीच्य किनाऱ्याजवळच्या छोट्या मोठ्या बेटांवर बसलेले पाणपक्षी, त्या काळ्या करड्या पक्ष्यांत मध्ये एखादा स्वच्छ पांढरा बगळा या साऱ्यांनी चित्त मोहून जाणे 'पक्षि लक्ष कूजितम्' हे शंकराचार्यांनी स्तोत्रात का म्हटले आहे ते खरे ठरते आहे.

चाणोद किनाऱ्यावरून नावेतून एक ओरसंग उपनदी पार करून कन्नारला उतरलो. नावेत चढताना बूट काढावे लागले नाहीत, पण उतरताना मात्र काढले होते. (खरे म्हणजे कोरड्या वाळूवर उडी मारता आली.) चाणोद आणि कन्नार येथे ब्राह्मणांचा वावर दिसला. कारण अनेक धर्मकार्ये/नारायण नागबळी यांसाठी मंडप उभारलेले आहेत. तसे हे ब्राह्मण/धोतर नेसलेले ब्राह्मण बस स्टॅण्डपासूनच ग्राहक/यजमान हेरताना दिसले. (हा भाग दक्षिण प्रयाग म्हणून ओळखला जातो त्यामुळे या शहराला महत्त्व प्राप्त झाले आहे असे मोठ्या आश्रमातील बटुक महाराजांनी सांगितले.)

कन्नोर सोडल्यावर पुन्हा मातीरस्ता, धुळीच्या पायवाटा, घळी, टेकड्या यांचे राज्य सुरू झाले. कन्नोर इथे सडक आहे. पण ती डभोई शहराकडे जाते. तिचा आम्हा परिक्रमावासीयांना काही उपयोग नाही.

रस्त्याला काटे फुटत होते. गाडीरस्तेसुद्धा V आकार करून वेगवेगळ्या दिशांना जात होते. सौख्याची गोष्ट म्हणजे कभी हवा असल्याने ऊन नव्हते. सावली देणारी झाडे फार नव्हती. पण रस्ते, पायवाटा लताकुंजामधून जाव्यात तसे झाडांचे बोगदे दोन-एक ठिकाणी लागले.



गाडीरस्ता धरून आम्ही विश्वासाने चाललो होतो

ते वडिया गावापासून. या गावाने चहा देऊन आमचे स्वागत केले होते. अकरा/साडेअकरा झाले होते. सांगितले तर कुणी इथे किंवा पुढील गावात खिचडी करून देईल का असे विचारल्यावर उत्तर मिळाले की नाही, कारण सर्व स्त्रिया शेतात जातात. हे उत्तर मला सयुक्तिक वाटले. खरंच वस्तुस्थिती होती ही!

गाडीरस्त्याने थोडे चाललो तर एकाने वर चढून पायवाटेने जायचा सल्ला दिला. वर चढलो तर दोन वाटा! एक सरळ तर दुसरी ९०° त जाणारी. सरळ वाट धरली नाही कारण ती गाडीरस्त्याला समांतर होती. अर्धा कि. मी. गेल्यावर कळले की ही पायवाट चुकीची असून सोडली ती वाट योग्य! कृपेने एक माणूस भेटला. त्यामळे चूक सुधारता आली. पुढे ती वाट पहिल्या गाडीरस्त्यालाच मिळाली! नर्मदे हर!!

हा गाडीरस्ता प्रमाण मानून पुढे जाताना एक छान मळलेली पायवाट वळणावर दिसली, पण गाडीरस्ता लांबून का होईना गावात जाईलच या विश्वासाने पुढे निघालो तो पुन्हा V आकाराचा फाटा! दोन्ही गाडीरस्तेच! उजवा सोडून डावा धरला, थोडे पुढे गेलो तर रस्त्याच्या मध्ये वाढलेली टाकळ्यांची इत्यादी वाळलेली झुडपे पाहिली आणि वाटले की ही वाट वापरात नाही. पुन्हा V जवळ येऊन बसलो. प्रतीक्षा करत!

दरम्यान अशोक त्याचा मला आजवर ठाऊक नसलेला इतिहास सांगत होता. डावा रस्ता बंद दिसतोय आणि उजवा रस्ता थेट नदीकिनारी जाईल, कोणत्या रस्त्याने जावे? उजव्या रस्त्याने दोन कुत्रे धावत आले आणि पुढे तसेच निघून गेले. मैय्याचा कौल समजून आम्ही निघालो आणि वर कळले की पूर्वी सोडलेली मळलेली पायवाटच धरायला हवी होती.

एकूण काय आम्ही वरवड गाव गाठले, पण चक्रव्यूहात फिरून! एक वाजून गेला होता. मैय्या जवळ होती. स्नान करण्यासाठी पुढे झालो, पण भोजन मिळणार नाही म्हणून मागे फिरलो, पुढील गावात जाण्यासाठी. गाव सोडताना दोन रस्ते दिसले म्हणून जवळच्या घरातील मुलीला हाक मारली. रस्ता विचारला व खिचडी मिळेल का अशीही पृच्छा केली, 'रोटी चालेल का म्हटले?' 'हो, काहीही चालेल, परंतु स्नानानंतर!'

आनंदाने स्नानास गेलो. अतिशय सुंदर, छान, निर्मळ, पवित्र, चैतन्यदायी नर्मदाजळाने स्नान केले आणि कपडे पिळून भोजनासाठी आलो.

रोटी (बाजरीची भारी) दही आणि (तूरडाळ) भाजी, एकच रोटी पुरून उरेल इतकी!

जेवताना आम्ही श्लोक म्हटले, 'हीना आणि या बहिणी, संस्कृत शाळेत आहे का?' तर 'हो' म्हटलेले श्लोक कळले का? 'तर म्हणाल्या 'हो.'

नंतर कळले की हे घर स्वाध्यायी आहे. वीस वर्षांहून अधि काळ गावात स्वाध्याय आहे. वडील रमणभाई योगेश्वर कृषि निमित्ताने विद्यापीठात येऊन गेले आहेत.

खरे म्हणजे स्वाध्यायी ही माझी ओळख परिक्रमेत देत नाही. परंतु हे घर स्वाध्यायी आहे हे मला भोजनानंतर समजले म्हणून स्वाध्यायाविषयी बोललो. राजेशभाई नावाचे एक स्वाध्यायी पुढे भेटले.

वरवड गाव पूर्ण स्वाध्यायी आहे. मोरया हे पुढील गाव ५०% तर त्यापुढील गाव मुस्लीम वस्तीचे आहे आणि वाटेत नंतर लागणारे शूळेश्वर मंदिर थोडे आडवाटेला आसून तिथून गाव २ किमी अंतरावर आहे. मोरया गावी बटुक महारांच्या हनुमान मठात थांबा असे राजेशने सांगितले व आम्ही १५ किमी वरील मोरया या गावी थांबलो. आमच्यासह एकूण ८ परिक्रमावासी संध्याकाळपर्यंत जमले. आम्ही चार/साडेचार दरम्यान हे गाव गाठले होते.

बटुक बाबा गेली ९॥ वर्षे इथे आहेत. पूर्वी सुरत

कामात आनंद निर्माण केला की त्याचं ओझं वाटत नाही.

येथे एका आश्रमाच्य व्यवस्थापनात होते. रात्री दोन प्रकारची खिचडी त्यांनी शिजविली, वझे दांपत्यसाठी बिनतिखटाची!

**दिवस ३६ वा मोरिया - तिलकवाडा - वासण (१५ किमी.) मु. प्राथमिक शाळा**

रात्री भरपूर थंडी जाणवली. रात्री पांढरी लुंगी व दिवसा केशरी लुंगी असा शिरस्ता माझा असतो. परंतु पांढरी लुंगी धुतलेली व केशरी वापरायची नाही. त्यामुळे झोपताना कोणतीच लुंगी नव्हती. रात्री ३॥ नंतर केशरी लुंगी लावावी लागली.



सकाळी ६।॥ ला प्रस्थान केले. मोरियापासून चुडेश्वरापर्यंत रस्ता चांगला आहे. पुढे मात्र डावीकडे वळल्यावर नेहमीचा धूळरस्ता सुरू होतो. निघताना बटुक बाबांनी चहा दिला होता. पुढला चहा चुडेश्वरात मिळाला. घर कुणाचे तर स्वाध्यायीचे! दारापुढील बदामाचे झाड पाहून मी ताडले की हे झाड या जंगलात कुठेच नाही याचा अर्थ हे कुणीतरी मुद्दाम आणून लावले आहे. तेव्हा मला कळले की माधववृन्द प्रयागातला हा वृक्ष आहे!

काल मळभी हवा होती, आजही आकाश तसेच होते. चुडेश्वर/तिलकवाडा गावाअलीकडे अस्लिन (अश्विन) नदी ओलांडावी लागली. पाणी स्वच्छ आहे, तळाची वाळू स्पष्ट दिसते. मी बूट काढेपर्यंत दोघे नदीचा प्रवाह ओलांडून गेले होते.

सॅकला बुटाच्या नाड्या मी घट्ट बांधल्या २६.१२.२०१२ (दिवस ३१ वा) या दिवशी नांदगाव-सोमज यांमधील नदीचा प्रवाह ओलांडल्यावर सॅकला बांधलेला एक बूट सुटून खाली पडला होता त्याची आठवण झाली.

पलीकडल्या पाऊलवाटेच्या खुणेने मी नदीपार व्हायच्या प्रयत्नात अधिकाधिक खोल पाण्यात जाऊ लागलो. पाणी मांडीच्याही वर लागायला लागले. ज्या अर्थी अशोक (जो माझ्याहून उंचीला कमी आहे) सुखरूप पार झाला आहे त्या अर्थी माझी दिशा चुकली असावी हे मला कळले. जरा उजवीकडे सरकल्यावर मी उथळ पाण्यात आलो व गुडघा बुडेल इतक्या पाण्यातून नदी पार केली. पात्र रुंद असले तरी प्रत्यक्ष प्रवाह वीस एक पावलांचा होता.



मणिनागेश्वराकडे जाताना पुन्हा एक नदी आहे, परंतु पाइप घालून वरून रस्ता झाल्याने बूट काढावे लागत नाहीत.

मणिनागेश्वर येथे सुंदर आश्रम आहे. मैय्याकिनारी साहेबजीबाबा येथे निःशुल्क उपचार करतात व काही आयुर्वेदिक औषधे देतात. मालिशची सर्व प्रकारची अत्याधुनिक यंत्रे येथे आहेत.

स्वामी अत्यंत देखणे, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे आणि तुलनेने तरुण आहेत.

आम्ही बारा वाजून पाच एक मिनिटांनी पोहोचलो. सकाळी स्वामी ट्रीटमेण्ट देतात. बारापर्यंत परिक्रमावासीयांची वाट पाहून नंतर स्वयंपाक करतात.

आश्रमातील जेवणाबद्दलचे, शनिवारी व्यक्त केलेले प्रतिकूल मत मला मैय्याने एक दिवसात बदलायला लावले. लग्नाच्या पंक्तीतसुद्धा मिळणार नाही इतकी स्वादिष्ट, सुंदर, बारीक तांदळाची, ज्यात बटाटा, तूर, टमाटे आहेत अशी खिचडी आम्हांला प्रसाद म्हणून वाढली. स्वामी व त्यांचा सहकारी आमच्यानंतर जेवले.

दरम्यान आम्ही स्नान व कपडे आटोपले होते. मणिनागेश्वरानंतर एक मोठा माळ ओलांडून आम्ही वीरपूर गाठले. राहायची सोय नाही, पुढे वासण गावी शाळेत अनुज्ञा मिळाली. समोरच्या मुस्लीम कुटुंबाने पाणी, दिवा, बादली, स्टीलचे पिंप, कांबळी इ. साहित्य पुरविले. त्यांच्या घरी बाजरीची भाकरी, भाजी, घरचे दूध असे भोजन केले. ते कुटुंब मुस्लीम आहे हे सांगितल्याशिवाय खरे वाटणार नाही इतकी छान वागणूक त्यांची होती. परिक्रमावासीयांचे चहापाणी, मागितल्यास भोजन हा त्यांचा शिरस्ता आहे. जियामतअली, मुलगा अब्दुल, झाकीर. पैकी अब्दुल शाळेच्या संचालक मंडळावर आहे त्यांची सर्व मुले म्हणजे हा सर्व परिवार याच विचारांचा आहे.

**दिनांक १ जानेवारी २०१३/मंगळवार दिवस ३७ वा वासण-छिछेरिया २० किमी मु. धर**

६॥। ला निघून २ तासांनी गरुडेश्वरास पोहोचला. तत्पूर्वी अगस्त्येश्वरात एका घरात मागून चहा घेतला. गरुडेश्वरापासून सरदार सरोवर बांध १४ कि.मी. आहे.

गरुडेश्वरास टेम्बेस्वामींची समाधी आहे. सुंदर, प्रसन्न मूर्ती असलेले दत्तमंदिर आहे. त्यात स्वामींची संगमरवरी मूर्ती आहे. तेथील पुराणोक्त शिवलिंगही पाहिले.

गरुडेश्वरापासून मोठा रस्ता लागतो, सडक मध्यंतरी नाहीसा झालेला सबजा पुन्हा हारीने दिसायला लागला. शेतांच्या कुंपणाला निवडुंग, शेतांमध्ये अधेमधे झेंडूचे गेंद दिसतात. ते आपोआपच येतात की काय कुणास ठाऊक? - ताड आणि कमी प्रमाणात नारळाची झाडे आहेत.

मोठ्या डांबरी रस्त्याला डावीकडे फाटा फुटतो तिथून लागणाऱ्या गावांमधून परिक्रमा मार्ग आहे. सुरुवातीला झाडे नव्हती. पाऊण-एक तासांतच आम्ही उन्हामुळे त्रासलो. साडेदहा-पावणेअकराच झाले होते. रस्त्याने अनेक मुले-मुली सायकलने गरुडेश्वरास शाळेसाठी निघालेली दिसली. अगदी साडेअकरापर्यंत भरपूर सायकली आम्हांला दिसल्या.

नंतर मात्र रस्त्याच्या दुतर्फा झाडे होती. कडुलिंब, वड, चिंड, पिंपळ, औदुंबर, बोराची भरपूर आणि लेकुरवाळी, लगडवेली झाडे, सर्वांगांनी फुललेला आणि तसाच लेकुरवाळा शेवगा, निलगिरी वृक्ष, पांगारा, बाभळी हे सर्व वृक्ष पुन्हा भेटत गेले.

या भागात ऊस दिसला नाही. कापूस संपला आहे, तूरही दिसली नाही, पण जेवणात मात्र मटारासारखी ओली तूर प्रत्येकाच्या घरात असते.

एरंडीची मोठी लागवड दिसतेय. सुमारे बारा वाजता आम्ही 'खडकदा' या गावात शिरलो व भोजन मिळेल का अशी पृच्छा केली.

इथे कुठेही काही मिळणार नाही. चार किलोमीटरवर एक गाव आहे तिथे सोय आहे असा स्पष्ट जवाब मिळाला. तसेच पुढे निघालो. वाटेत रस्त्याखालून पाइप टाकून नदीप्रवाह रस्ता ओलांडतो. तिथे सुंदर घाट दिसला. अनेक स्त्रिया धुणे धूत होत्या आणि नदीचा प्रवाह स्वच्छ, वेगवान होता.

भोजन आणि स्नान एका वेळी झाले तर वेळ वाचतो, नुसत्या स्नानासाठी कसे थांबावे?

पलीकडे एक घर सोडून पुढल्या घरात एक तरुण दिसला; त्याला अडचण सांगितली व असेल तर कोणतेही भोजन चालेल असे सांगितले.

'विचारायला हवे' असे म्हणून तो घरात गेला व भोजनाची व्यवस्था झाली. आम्ही स्नान करून येईपर्यंत भोजन, (विशेषतः तिखट नसलेली भाजी) तयार होते. दोन भाज्या, भात, रोटी (जाड पोळी).

रणजित तडवी असे या तरुणाचे नाव होते. घरात बरीच माणसे होती. नातवंडांनी, लहान मुलांनी तर आम्हांला दादाजी दादाजी म्हणून आजोबापणही बहाल केले.

जेवणानंतर लगेच निघालो. आम्हांला त्रास वाटला तरी आज हवा थंड होती, वारा होता, सावली होती आणि सूर्य मंदमंद तापत होता. ही केवळ मैय्याची कृपा!

ज्या आश्रमात सर्व मिळेल असे सांगून आम्हांला पुढे हाकलत होते, ते गाव चहाच्या वेळी म्हणजे ३.०० वाजता आले.

तिथल्या हनुमान मंदिरातील बाबांनी स्वागत केले व चहा हवा तर दुधाशिवाय पण साधन मिळेल, तुमचा तुम्ही करून घ्या असे सांगितले (याचा अर्थ न जेवता इथे आलो असतो तर सदावर्त मिळाले असते, भोजन (तयार) नाही!)

आता बांबूची वने, परंतु अंगणात, शेतात लक्षात येतील इतक्या प्रमाणात दिसायला लागली आहेत. एका ठिकाणी तर पिवळा बांबू पाहिला. बांबूची पाने पांढरी पिवळी झाली आहेत आणि बांबू उंच काड्या न दिसता एखाद्या वृक्षाचा शाखा/पल्लप विस्तार असावा तसे दिसतात.

वाटेत बोरांचा खच पडलेला दिसला. लहानमोठ्या सर्व बोरींना खच्चून बोरे लागली आहेत. आता पठारी प्रदेश दिसायला लागला आहे. डोंगरांच्या रांगा उजवीकडे आपले अस्तित्व दाखवू लागल्या आहेत. हवा स्वच्छ नसल्याने धूसर दिसतात.

इथे लहान टपऱ्या गावागावात आहेत. तिथे पाकीटबंद खाद्यपदार्थ (वेफर्स, चिवडा इ.) असले तरी प्रामुख्याने पेट्रोल विकले जाते. टायर ट्यूब पंक्चर काढणाऱ्या दुकानाच्या समोर रस्त्यावरून सहज दिसेल अशा तऱ्हेने टायरचा ढीग किंवा चळत लावून त्याला चुना इ. फासून लक्ष वेधून घेतात तसेच या टपऱ्यांसमोर १/२, १ लिटर पेट्रोलच्या बाटल्या स्टुलावर ठेवलेल्या असतात / टांगलेल्या असतात.

प्रत्यही पाण्याचा माठही असतो. तोही तीन फांद्या असलेल्या बुंध्याचे तिकाटणे करून त्यावर ठेवलेला असतो.

टणटणी फुले मी पूर्वी, लहानपणी पाहिली होती. एकाच प्रकारची होती, शेंदरी रंगाची! आता मात्र एकरंगी, दुरंगी - लाल (गुलाबी) आणि पिवळी मंद रंगतीची!

मार्गक्रमण डांबरी, चांगल्या रस्त्याने होते. छिछडिया गाव वळणानंतर दिसू लागले. दोन-चार शेतघरे अलीकडे होती, पण गावापासून दूर. शाळेतील मुले सायकलने येताना दिसली. ५ वाजायला २० मिनिटे होती, तरीही शाळा सुटली होती याचे नवल वाटले. काल वासण शाळा ५ वा. सुटली होती.

शिक्षक घरी जाण्यापूर्वी शाळेत पोहोचावे या इराद्याने मधला रस्ता धरून जलद निघालो तोच वळणावरच्या दुकानवजा घरातून बाहेर येऊन एका महिलेने आम्हांला गाठले व अंबाजीमातेकडे जायचा रस्ता/कच्चा रस्ता आम्हांला दाखविला, जो त्या डांबरी सडकेपासून वेगळ्या कोनात जात होता.

थोडक्यात, ते घर परिक्रमावासीयांच्या सेवेत तत्पर असल्याने आमच्या मदतीला धावले. आम्ही ज्या रात्र मुक्कामाच्या चिंतेत होतो. ती काळजी मिटली. रात्री मक्याची रोटी, भात, भाजी, मिठाई आणि गूळ इतके पदार्थ भोजनात होते. भोजनात गूळ पाहून मला पुन्हा एकदा मैय्याच्या कृपेची प्रचिती आली. एक अर्ध्या तासापूर्वी, इथे पोहोचण्यापूर्वी, मागच्या गावात मी गुळाचीच आठवण काढली होती. म्हटले होते की बरोबर गूळ ठेवला पाहिजे. कारण उन्हातून, विशेषतः जेवणानंतर चालताना उन्हाचा तडाखा जाणवतो व सारखे पाणी लागते अशा वेही गूळ खाल्ला तर पाणी बाधत नाही व गोडामुळे लगेच शक्ती मिळते.

वळणावरच्या, गावाच्या अलीकडे १/२ किमी. असलेल्या त्या दुकानवजा घर वजा दुकानात राहणारे कुटुंब होते 'नरसीभाई-सौ. शारदाबेन.' सोबत मुलगी व जावई! मोठे कौलारू घर, मध्ये दुकान, एक बैल परसात आणि पाण्याची व्यवस्था म्हणजे मुख्य सडकेपलीकडे असणारा हातपंप.

अंबामातेकडे जाणारा कच्चा रस्ता इथूनच फुटतो आणि परिक्रमावासी या रस्त्याने गावात न शिरता निघून जातात. म्हणून केवळ गाव सोडून, नरसीभाईंनी इथे कौलारू घर बांधले. फक्त सेवेचा हा आनंद मिळावा म्हणून! या घरात वीजसुद्धा नाही, तरी अत्यंत प्रेमाने, आनंदाने ते इथे राहतात आणि चार महिने सोडल्यास रोज परिक्रमावासीयांना चहा/पाणी/भोजन/निवास याची आवश्यकतेनुसार सेवा देतात.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

(पृष्ठ क्र. १२ वरून **मेजवानी संस्कृतची** )

वडिलांनी म्हटले, ''मुला, माझ्या आज्ञेनुसार पत्र लिही.'' त्याने पत्र लिहिले नाही आणि पित्याच्या आज्ञेचे उल्लंघनही केले नाही.

या विसंगतिपूर्ण श्लोकातील 'न तेन' हे शब्द जोडून हे कोडे सुटते. 'नतेन' म्हणजे नम्र अशा त्याने! अशा प्रकारे - नम्र अशा त्याने पत्र लिहिले आणि पित्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही.

१२) एको ना विंशतिः स्त्रीणां स्नानार्थं सरयुं गताः।
विंशति पुनः आयाता एको व्याघ्रेण भक्षिताः॥

एकोणीस स्त्रिया स्नानासाठी सरयू नदीवर गेल्या. त्यांतून वीस परतल्या. वाघाने एकाला खाल्ले.

या विसंगत कोड्याची उकल 'एको ना' ( ना म्हणजे नर - नृ शब्दाचे प्रथमा एकवचन!) असा संधी सोडवल्याने होते. एक पुरुष व वीस स्त्रिया नदीवर गेल्या. पुरुषाला वाघाने खाल्ले. वीस स्त्रिया परत आल्या.

१३) केशवं पतितं दृष्ट्वा पाण्डवाः हर्षनिर्भराः।
कौरवाः रूरूदुः सर्वे हा केशव केशव॥

कृष्णाला पडलेले पाहून पांडवांना आनंद झाला. सगळे कौरव रडायला लागले - 'अरे कृष्णा कृष्णा!'

'के शवं पतितं दृष्ट्वा' याचा अर्थ 'पाण्यात पडलेला मृतदेह पाहू.' 'पांडव' याचा दुसरा अर्थ बेडूक तर 'कौरव'चा कावळा असा होतो. 'रूरूदुः' - ओरडले की 'शव पाण्यात पडले, शव पाण्यात पडले'

आवडली ना ही संस्कृतातली मेजवानी? इथे तर अगदी मोजकेच मोती देता आले, मात्र प्रत्यक्षात संस्कृतात अशा असंख्य रत्नांची समृद्ध खाण आहे!

**रेवती मिलिंद कुलकर्णी**
द्वितीय वर्ष / कला

●●●

# व्यक्तिवेध-०१ : ओज-शंकराची कहाणी

*ओज-शंकर यांचा ६ डिसेंबर १९२४ हा जन्मदिवस. त्यांच्या कार्याची महती सांगणारा हा लेख - संपादक*

१६ मे २०१४ रोजी लोकसभा निवडणुकांचे निकाल घोषित झाले. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक प्रचारक पंतप्रधान होण्याची काही ही पहिलीच वेळ नव्हती. अटलबिहारी वाजपेयी हेही संघप्रचारकच आहेत. मात्र ह्यामुळे, संघप्रचारक असतात तरी कसे, ह्याबाबत कमालीचे औत्सुक्य जनमानसात निर्माण झाले. ही कहाणीही अशाच एका देदीप्यमान संघप्रचारकाची आहे.

श्री. शंकर दिनकर उपाख्य भैयाजी काणे (जन्म : ६ डिसेंबर १९२४, वरवडे, रत्नागिरी मृत्यू : २६ ऑक्टोंबर १९९९, कोल्हापूर) हे न्यू तुसॉम, जिल्हा उख्रूल, मणिपूर राज्य, भारत, ह्या त्यांच्या कर्मभूमीत, ओज-शंकर म्हणून ओळखले जातात. तिथे पूर्व-सीमा-विकास-प्रतिष्ठानतर्फे स्थापन करण्यात आलेल्या ओज-शंकर विद्यालयाच्या स्वरूपात आज त्यांचे कार्य दिमाखाने उभे आहे. शिक्षणाद्वारे राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या त्यांच्या जीवनव्यापी ध्यासाचे आज एका मोठ्या चळवळीत रूपांतर झालेले आहे. त्या त्यांच्या भरतभूस ललामभूत ठरलेल्या कार्याची ही कहाणी आहे.

भैयाजींचे प्राथमिक शिक्षण पुण्यात आणि माध्यमिक शिक्षण साताऱ्यात झाले. ते १९४० साली शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. १९४२ ते १९४४ अशी दोन वर्षे त्यांनी इंडियन एअर फोर्समध्ये ग्राउंड इंजीनिअरिंग कॉर्प्समध्ये, लाहोर, कोलकाता व सिकंदराबाद येथे नोकरी केली. १९४४ साली नोकरी सोडून त्यांनी पुण्यात सर परशुरामभाऊ महाविद्यालयात नाव नोंदवले. १९४६ साली ते संस्कृत विषय घेऊन, विशेष प्रावीण्यासह बी.ए. झाले. पुढे बी.एड. आणि एल.एल.बी.ही झाले.

१९४८ साली संघावर बंदी आली होती तेव्हा भैयाजी सहा महिने तुरुंगात गेले. १९५० मध्ये ते संघाचे पूर्ण वेळ प्रचारक झाले. १९५८ पर्यंत एकूण आठ वर्षे मंगलोर, गुलबर्गा, रायचूर ह्या भागात प्रचारक राहिले. ते कुशल संघटक होते. उत्साही प्रशिक्षक होते आणि निष्ठावान स्वयंसेवक होते. उंच, गोरेपान, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे भैयाजी जिथे जिथे गेले, तिथले लोक त्यांची आजही आठवण काढतात.

१९५८ ते १९७१ भैयाजींनी सिन्नर (नासिक), चिंचणी (ठाणे), जशपुरनगर (छत्तीसगड), वसई, निर्मळ, भुईगाव, कळंब, वाघोली (ठाणे), कोंढ्ये (तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी) इत्यादी निरनिराळ्या गावांत शिक्षकाची नोकरी करून उपजीविका चालवली. स्वतःच्या पायावर उभे राहून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम केले. ते उत्तम मल्लखांबपटू, प्रशिक्षक आणि प्रणेते होते. संस्कृत साहित्याचा अपार अभ्यास आणि अनेकविध स्तोत्रांचे अफाट पाठांतर असल्याने त्यांना व्यक्तीस वश करून घेण्याची कला सुरेख साधलेली होती. आदर्श शिक्षकाचा जणू ते वस्तुपाठच होते. ह्या साऱ्यास कौशल्याचा त्यांना संघकार्यात भरपूर उपयोग होत असे.

आपल्याला विचारले की भारताचे पूर्वेकडील सर्वांत मोठे शहर कोणते? तर एखादा सहजच कोलकात्याचे नाव घेईल. मात्र मुंबई ते कोलकाता अंतर १,६६४ किमी आहे तर, कोलकाता ते न्यू तुसॉम १,६७८ किमी. म्हणजे अर्धा

भारत तर कोलकात्याचे पार, पूर्वेलाच आहे. त्या भारताच्या भूमीस आपण आपले समजावे ह्याकरता प्रयत्नशील असलेल्या श्री. गोळवलकर गुरुजींनी, भैयाजींना ईशान्य भारताशी जवळचे संबंध स्थापन करण्याकरता ईशान्येत जाण्याची सूचना केली.




१९७१ सालच्या जून महिन्यात, कोंढ्ये येथील नोकरी सोडून ते जाणीवपूर्वक पूर्वांचलात गेले. प्रथम इंफाळमधील पंजाबी हायस्कूलमध्ये नोकरी केली. मग १९७३च्या जूनमध्ये ते कोंढ्याच्या जयवंत कोंडविलकर ह्या बारा वर्षे वयाच्या, सातवीत शिकणाऱ्या मुलासह, मणिपूर राज्यातील उख्रूल जिल्ह्यातील, न्यू तुसॉम गावात एका ख्रिश्चन उच्च-माध्यमिक-शाळेत नोकरी करू लागले. हे त्यांच्या शिक्षणाद्वारे राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या ध्येयास अनुसरूनच केलेले होते. उत्तम शिक्षण आणि बहिःशाल कार्यक्रमांद्वारे ते प्रथम विद्यार्थिप्रिय झाले आणि पुढे पालकांच्याही पसंतीस उतरले.

मराठी, कानडी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, मैतेयी (मणिपुरी) भाषांवर त्यांची उत्तम पकड असल्याने ते लोकांना समजून घेऊ शकले. त्यांच्याशी सुसंवाद करू शकले. शिवाय प्रेमळ, आर्जवी, आनंदी आणि उत्साही स्वभावामुळे ते लोकांच्या मनांत प्रवेश करू शकले. शाळेचे व्यवस्थापन ख्रिश्चन मिशनऱ्यांचे असून आणि भैयाजी स्वतः हिंदू असूनही, त्यांना वसतिगृहाचे पर्यवेक्षक नेमले गेले. त्यांनी पूर्ण वेळ मुलांसोबत राहून, पहाटेपासून मुलांना एकात्मतेची जाण दिली. भारतीयत्वाची जाण दिली. शारीरिक शिक्षण दिले. त्यांना मल्लखांब, निरनिराळे खेळ शिकवले. भारतीय भूप्रदेशांची, संस्कृतीची आणि प्रातःस्मरणीय व्यक्तित्वांची सम्यक ओळख करून दिली. आजारपणांत पालकांप्रमाणे शुश्रूषा केली. त्यामुळे ख्रिश्चनबहुल समुदायात त्यांचे अल्पावधीतच स्नेहबंध निर्माण झाले.

१९७३ च्या सप्टेंबरमध्ये त्यांच्या मातोश्री निवर्तल्याची तार आल्याने त्यांना नाइलाजानेच परतावे लागले. परंतु त्याही परिस्थितीत त्यांनी लालमोहन शर्मा ह्या मैतेयी आणि शंकन ह्या तांगखूल नागा मुलासही जाणीवपूर्वक सोबत घेतले. जयवंतही सोबत होताच. सांगलीत आईचे दिवस पूर्ण होताच त्यांनी स्वतः शिक्षकी पेशा पत्करला आणि मुलांना सोबत घेऊन राहू लागले. पुढे ह्या मुलांना घेऊन ते जेव्हा न्यू तुसॉमला परत गेले तेव्हा त्यांची प्रगती झालेली पाहून इतर पालकही आमच्या मुलांना घेऊन जा, शिकवा, असे मागे लागले. जास्त विद्यार्थ्यांची सोय करणे त्यांना आर्थिकदृष्ट्या झेपणारे नव्हते. पण असल्या बारक्या समस्यांना दाद देतील तर ते भैयाजी कसले! त्यांनी सांगलीतील प्रतिष्ठित व्यक्ती व संस्थांनाही ह्या चांगल्या कामास हातभार लावण्यास विनंती केली. समाजानेही त्यांचा शब्द वाया जाऊ दिला नाही. मग १९९२ पर्यंत त्यांनी शेकडो विद्यार्थी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रात आणले, शिकवून मोठे केले आणि त्यांना प्रेरित करून पुन्हा पूर्वांचलात पाठवले. आज ते विद्यार्थीच

जबाबदार नागरिक झालेले आहेत. त्यांच्या उद्दिष्टास पुढे नेत आहेत.

पूर्वांचलातील कामांत त्यांनी संघसंपर्कांचा मुळीच उपयोग केला नाही. कुठेही ते दीर्घकाळ राहिले नाहीत. त्यांना कायमस्वरूपी असे घरच नव्हते. गोळवलकर गुरुजींनी एकदा त्यांना विचारले, भैय्या, तू सारखा फिरत असतोस, स्थिर का होत नाहीस? तेव्हा भैयाजी म्हणाले होते, मी अनिकेत आहे, पण स्थिरमती! ह्याला गीतेच्या बाराव्या अध्यायातील एकोणिसाव्या श्लोकाची पार्श्वभूमी आहे. तो श्लोक असा आहे :

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिः भक्तिमान् मे प्रियो नरः॥
भगवद्गीता - १९-१२

म्हणजेच

निंदा स्तुति न घे मौनी मिळे ते गोड मानितो ।
स्थिर बुद्धि निराधार भक्त तो आवडे मज॥ - गीताई-१९-१२

''अनिकेतः स्थिरमतिः'' हे भैयाजींनी केलेले स्वतःचे वर्णनच त्यांचे सर्वांत यथार्थ वर्णन आहे. त्यामुळे अर्थातच ते भगवंतांची प्रिय व्यक्ती असायलाच हवेत.

१९९२ नंतर त्यांनी वानप्रस्थाश्रम पत्करला. एकाकी जीवन जगणे पसंत केले. कुठेही दीर्घकाळ राहिले नाहीत. कुणासही भारभूत झाले नाहीत. ते त्यांच्या स्वभावातच नव्हते. २६ ऑक्टोबर १९९९ रोजी, बंधूंच्या घरीच कोल्हापुरात, मेंदूतील कर्क अर्बुदा (ब्रेन ट्यूमर) मुळे त्यांचा मृत्यू झाला. ही वार्ता कळली तेव्हा जागोजाग त्यांच्या विद्यार्थांना पोरके वाटू लागले. २६ ऑक्टोबर २००० रोजी न्यू तुसॉम येथे झालेल्या श्रद्धांजली सभेत त्यांच्या विद्यार्थ्यांनी आणि गावकऱ्यांनी त्यांना वाहिलेल्या श्रद्धांजलीचे शब्द मुळातच वाचण्यासारखे आहेत (१).

२००२ साली त्यांच्या एका मित्राने, श्री. अ. गो. कुंटे ह्यांनी त्यांचे एक चरित्र प्रकाशित केले. त्या पुस्तकात त्यांच्या कामाचे थोडक्यात वर्णन उपलब्ध आहे (२). मात्र, भैयाजींसारख्या प्रसिद्धिपराङ्मुख व्यक्तीचा माग काढणे मुळीच सोपे नाही. तरीही त्यांच्या लाखो चाहत्यांच्या मनांत त्यांच्या आठवणी सदैव ताज्या आहेत. त्यांचे विद्यार्थी आणि पुढे दहाहून अधिक वर्षे पूर्वांचलात राहून त्यांच्या कामास पूर्णत्व देणारे श्री. जयवंत कोंडविलकर यांच्या आठवणींवर आधारित ''उखूलचे आव्हान''(३) हे पुस्तकही मुळातच वाचनीय आहे. अलीकडेच, त्यांच्या ईशान्येतील कामाच्या आजच्या मूर्त स्वरूपाची माहिती, सर्व जगास सादर करणारे एक छोटेसे संकेतस्थळही उदयास आलेले आहे (४). एवढेच सांगून ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण करतो. त्यांच्या कामाचे वर्णन करणारे ओज-शंकराष्टक आपणांस सादर करतो!

थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पाहा जरा ।
आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा ॥

संदर्भः


१. एका शाळामास्तरची भारत परिक्रमा, दे. कों. सातभाई, प्रकाशक : पूर्व-सीमा-विकास-प्रतिष्ठान, १६ ऑक्टोबर २००१, पृष्ठसंख्या-१५२, किंमत : रु.६०/- फक्त.

२. अलौकिक कर्मयोगी स्वयंसेवक, अ. गो. कुंटे, प्रकाशक : जयवंत गणपत कोंडविलकर, २४ जुलै २००२, पृष्ठसंख्या-१३८, किंमत : रु.६०/- फक्त.

३. जयवंत कोंडविलकर यांच्या आठवणींवर आधारित 'उखूलचे आव्हान', शब्दांकन पुरुषोत्तम रानडे, पृष्ठसंख्या-५७, (हे पुस्तक अजून प्रकाशित झालेले नाही. वाटेवर आहे).


---

ज्या गोष्टींशी आपला काहीही संबंध नाही त्यात नाक खुपसले की तोटाच होतो.

४. पूर्व सीमा विकास प्रतिष्ठानचे अधिकृत संकेतस्थळ http:/ishanyavika.org ह्या संकेतस्थळावर, वरील सर्व विजकीय पुस्तके (इ-बुक्स), तसेच भैयाजींवरील पंधरा मिनिटांचा एक माहितीपट, अधोभारणास (डाउनलोडकरता) उपलब्ध आहे.

**ओज शंकराष्टक**

तुझीच ओज-शंकरा, स्मृती मनात वाहतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥धृ॥

प्रसार संघशक्तिचा, विचार भावला तुला ।
जगात आचरून प्रेममार्ग, पाय रोविला ॥
कसा मिळेल वारसा तुझा, विचार राहतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥१॥

कधी सुरेल बांसरी, प्रहार तू प्रशिक्षिले ।
कुमार, बाल, वा युवा, तुवा पुरे खुळावले ॥
व्यक्ती, व्यक्ती, शिबिर-साक्ष, तेच दीस शोधतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥२॥

कसा, कुठे, कधी, कुणी, विचार प्रेरिला मनी ।
अपूर्व-पूर्व अंतरा[१] न थोर मानले जनी ॥
तुझेच शिष्य, चाहते, तुला मनात बाहतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥३॥

तळात कोकणातुनीहि नागभूमि[२] गाठली ।
एकात्मता धरून नेम देशभक्ति पेरिली ॥
मितेय, नाग, तांगखूल, मुंबईस जोडतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥४॥

ब्रम्हचर्यी कुणास काय प्राप्त होत संतती ।
तुला मुले अनेक, ती तुझेच नाव सांगती ॥
न पुत्र वागला कुणी, असाच निष्ठ राहतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥५॥

निवासती मुलेमुली, अशी गृहेहि राखली ।
मुलांस, पालकांस, ना मुळीच धास्ति वाटली ॥
जपेल पालकापरी, असे समाज मानतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥६॥

मराठमोळ, कानडी असोहि तेलुगू कुणी ।
मितेय, नाग, तांगखूल, शिष्य सर्वही गुणी ॥
तुम्हांस लोभला, खचीत ध्येय शुद्ध गाठतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥७॥

असेच दीप दाखवू, अशीच रीत नांदवू ।
एकात्मता फिरून, देशबांधवांत जागवू ॥
पथावरून जाऊ त्याच, ब्रीद हेच सांगतो ।
समर्थ मातृ-भूमिला, जगात पाहु चाहतो ॥८॥

[१] मुंबई ते कोलकाता १,६६४ किमी अंतर, अधिक कोलकाता ते उख्रूल १,५७८ किमी अंतर, अधिक उख्रूल ते न्यू तुसॉम १०० किमी अंतर असे एकूण ३,३४२ किमी अंतर, भैयाजींनी क्षुल्लक भासावे इतक्यांदा पार केले, इतक्यांदा शेकडो मुलांची तिथून इथवर ने-आण केली.

[२] कोकणातील कोंढ्ये गावातून ते थेट मणिपूर राज्यातील म्यानमारच्या सीमेवरील न्यू तुसॉम गावात, शिक्षणाद्वारे राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्याच्या आपल्या ध्येयाच्या साधनेकरता, १९७१ साली रवाना झाले होते.

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रस्ताविक**

भोंदू 'भगवान' भोळे भक्त - दिनेश गुणे

''श्रद्धेच्या बाजारीकरणाला राजकीय कवच - टेकचंद सोनवणे, लोकसत्ता-पा.नं.९ ता. २३.११.२०१४

**श्रद्धा - अर्थ सामाजिक की आध्यात्मिक?**

दिशाच्या ऑक्टोबर २०१४ अंकात आपण 'श्रद्धा' ह्या विषयावरच विचार मांडला. मुळात 'श्रद्धा' हा शब्द किंवा ह्या संकल्पनेचे बीज, हे 'वेदिक संस्कृतीत' आहे, हे पाहिले. ते पुन्हा उद्धृत करतो. भगवद्‌गीतेच्या अध्याय १७, श्लोक ३ मध्ये तो वापरला आहे.

**सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।**
**श्रद्धामयोयं पुरुषो सो यच्छ्द्धः स एव सः॥१७॥३॥**

एवढेच नव्हे तर ''श्रद्धा'' हा गुण प्रत्येक मानवाच्या आत्म्याचा (जीवात्म्याचा) अभिन्न संस्कार आहे व तो सूक्ष्म शरीराचा अविभाज्य भाग म्हणून जन्म जन्मांतरी, आत्म्याला मिळणाऱ्या शरीरबद्ध 'पुरुषाचा' आत्मप्रवृत्तीचा 'न दिसणारा, पण जागृत झाल्यावर मानवाच्या कर्माचा आशय बनतो हे पाहिले. शिवाय ह्या श्रद्धेच्या न टळणाऱ्या प्रभावाखाली त्या त्या मानवाचा देहस्वभाव, बुद्धी, अंतःकरण, त्या मानवाचा स्वभाव, प्रकृती व 'बीजरूप' बनतो. ह्याचा 'दृश्य परिणाम' म्हणजे ह्या श्रद्धेच्या स्वरूपातच त्या मानवाचा आत्मिक (Consciousness) उद्धार, जीवनधर्म होऊन त्याचे जीवन क्रमशः 'उत्क्रांत' होत जाते हे पाहिले! हा विश्वातील सर्जनशक्तीचा एक 'न दिसणारा', पण जीवनधर्म बनून जातो व त्या मानवाला घडवतो. ह्याचा पुरावा काय तर ह्या जीवनधर्म (Law of Life) प्रभावाखाली त्या त्या जीवात्म्याची 'अभीप्सा' म्हणजे 'Aspiration' व्यक्त होत असते व तसा तो माणूस, आकार, स्वभाव, 'प्रज्ञात्मा' (Consciousness) व स्वरूप, प्राप्त करू लागतो. हा एक वैश्विक धर्म किंवा कायदा (Cosmic creation, evolution Rule) आहे हे 'सत्य' आहे.

त्यामुळे ही 'श्रद्धा' मूळ बीज सत्य अर्थाने एखादी सामाजिक अर्थाची संकल्पना किंवा उथळपणे ठरणारी विश्वास अशी चीज नव्हे, कीं जी विरणारी वा नष्ट होणारी गोष्ट आहे!! त्यामुळे, 'अंधविश्वास निवारण समितीचे पुढारी व कार्यकर्ते व आता त्यांनी मिळवलेला एक सामाजिक कायदा (State Act) ह्या ''वैश्विक श्रद्धेला'' 'व्यवहारी नियंत्रण' करू शकत नाहीत, कारण ती कुठल्याही प्रकारच्या वैश्विक सत्यासारखी (Reality) नसून - एक साधी फसवाफसवी आहे, त्यामुळे भौतिकवादी, ज्या अर्थाने हा 'भोळसटपणा' पाहतात तसा प्रकार नसून एक साधा भ्रमयुक्त, विश्वासाचा भाग आहे. याउलट, 'अतार्क्कि श्रद्धा' ही प्रत्येक आत्म्याची न पुसणारी गुणप्रवृत्ती, ही त्या मानवाच्या 'आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गावर त्याला एखाद्या Lighhouse सारखा प्रकाश दाखवून त्याच्या जीवन प्रवाहाला दिशा दाखवीत असते व मदत करते. ही एक ईश्वरी योजनेची संकल्पना व कार्यक्रम आहे.

**वर्तमानपत्री वाद**

लेखाच्या सुरुवातीला जी दोन शीर्षके लिहिली

आहेत ती 'लोकसत्ता' ह्या दैनिकाच्या २३ नोव्हेंबरच्या अंकातील लेखांची आहेत.

**दोन प्रातिनिधीक लेख**

दोन्ही लेखांचा विषय 'रामपाल बाबा व त्याच जातीच्या 'बाबाबुवांचा' आहे. श्रद्धा व विश्वास : ह्या शब्दांच्या अर्थामध्ये फार सूक्ष्म फरक आहे. हा त्यांच्या बीज संकल्पनांत आहे श्रद्धा ही अध्यात्मशास्त्रातील संकल्पना आहे व ती आत्म्याची अनंत काळातील शास्त्ररचित आहे. उदाहणार्थ : असतो मा सद्गमज तमसो मा ज्योर्तिगमय व मृत्योर्मा अमृतम् गम'' ह्या इच्छाशक्तीच्या आत्मिक प्रार्थनेची स्मृती आहे. आत्म्याप्रमाणेच अमर आहे व जीवात्म्याच्या जन्म, मृत्यू, पुनर्जन्म चक्रीय गतीमध्ये युगायुगात त्या सिद्धी ज्ञानाची पूर्ती शोधत निरंतर वावरत असते.

शरीरबद्ध काँशसनेसमध्ये चित्रात होते. विश्वास ही संकल्पना एक युगायुगातल्या मानवी समाजाच्या मनावर परिणाम करणारी व व्यक्ती व्यक्तीच्या अंतरात भेदात्मक रितीने होणारा परिवर्तनकारी तात्पुरता संस्कार आहे. शरीरबद्ध शक्ती आहे. व जीवनातील प्रत्येक वैचारिक व बौद्धिक तरंगातील प्रवाहावर अवलंबून संस्कारित होत असतो बदलत असतो.


आजकालच्या विचारवंत व विद्वानांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आहे. तो भौतिकवादी विज्ञान व जीवनपद्धतीवरील विश्वासाचा संस्कार आहे. तसेच पाश्चात्य पद्धतीच्या सामाजिक भौतिकवादी शास्त्रावर एकांगी (Exclusive) विश्वास ठेवणारा आहे.

ह्या विचारवंत व विद्वानांचा वेदिक विज्ञानावर अभ्यास नाही व विश्वासही नाही. कारण परंपरा व सनातन धर्म (Cosmic Law) ह्याच्या सत्य (Reality) धारणेवर विश्वास नाही कारण त्यांची बुद्धीही पूर्वग्रही संस्कारित आहे. पुष्कळवेळा हा पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव असल्यामुळे उद्‌भवलेले आढळेल!!

''ध्येय विज्ञान ह्याचे सामर्थ्य व सत्यता ही बीज पद्धतीचे ज्ञान आहे व त्याचे संशोधन व प्रगटीकरण हे 'अतींद्रिय साधनेने योग ज्ञानाने' अनुभूतीच्या तंत्राने साधते!! ही तंत्रे व साधना समाज स्मृतींतून परकीय आक्रमकांनी नाहीसा करण्यात यश मिळविले आहे. ह्या वेदिक ज्ञानाची स्मृती जागृत करून जीवात्म्यावर स्थापित करण्याची इच्छा नष्ट झाली आहे. ही एक दुर्दैवी परिस्थिती आहे व राजकीय व सामाजिक नेतृत्व असहिष्णू अनुत्सुक, अजिज्ञासू बनले आहे!! हि श्रद्धा!

दिनेश गुणे हे चंद्रास्वामी, आसाराम बापू यांचाही उल्लेख करतात. ते काय म्हणतात?




श्री. सयनाचार्य

''....जनतेच्या धार्मिक भावनांचे आणि अंधश्रद्धेचे भांडवल करून अनेक बाबा बुवांनी आपआपली दुकाने

थाटली आणि गोळा केलेल्या 'मायेच्या' जोरावर राजकारणापासून अन्य अनेक क्षेत्रांवर आपली हुकमत गाजवली. या बाबा बुवांच्या व्यवस्थेने जनजीवनात अनावश्यक आणि अनधिकृत लुडबुड सुरू केली आहे?''



तर टेकचंद सोनवणे लिहितात कीं ''श्रद्धेच्या बाजारीकरणाला राजकीय कवच!'' ''कोण कुठल्या रामपालची गचांडी धरण्यासाठी राज्य सरकारला ३० हजार जवानांना तैनात करावे लागले. यावरून रामपालच्या शक्तीची कल्पना येते. राजकरण्यांच्या भारगिरीचे दर्शन या वेळीही झाले. रामपालच्या मुसक्या आवळण्याऐवजी मुख्यमंत्री खट्टर यांनी त्याला शरण येण्याची विनंती केली. बुवा बाबांनी लोकशाही व्यवस्थेला आव्हान देणे आपल्यासाठी लज्जास्पद असून अशांना आता रोखावेच लागेल....''.

**'श्रद्धा' ह्या नामाच्या बीजाची व्यवहारी अभिव्यक्ती**

पुन्हा एकदा 'श्रद्धा' ह्या शब्दाचे बीज शोधूया!!

वैखरी पद्धतीने जो शब्द मानवी मुखातून उच्चारला जातो त्याचा उगम जीवात्म्याच्या आत्म्यातून त्याने जाणलेल्या 'श्रद्धा संकल्पनांचा' उगम पावून त्याला 'परा' रूप येते म्हणजे आत्म्यापासून विभक्त व्हावे लागते. मग त्याच प्रश्नांनी ह्या स्थितीत, बुद्धीच्या मदतीने अंतःचक्षूंनी पाहिले जाते, व त्यानंतर, 'मध्यमा' ह्या स्थितीत त्याचा वापर मुखाने करण्यासाठी व्यवहारी 'वैखरी' उच्चारण होते.

ह्याचा अर्थ जर ही संकल्पना जीवात्म्याने चुकीची धारण करून स्मृतीत ठेवली असेल, तर तिच्या पुढच्या स्थितीत ती अलग रूपात तिला पाहिले जाते व त्यानंतर त्या संकल्पनेच्या अज्ञानी जाणिवेच्या अर्थाचेच साकार स्वरूप फक्त अंतरश्चक्षूंनी पाहून Certify होते व मध्यमेतून वैखरी (Skill based on the mouth infrasnature) म्हणजे आवाज, जीभ, दात, ओठ, कंठ ह्यांच्या Joint Effort ने संयुक्त, सहकार्याने, 'शब्द उच्चारण' होते. ही सगळी हालचाल अत्यंत विद्युत्प्रवाही वेगाची व शक्तिवी असल्यासारखी एका क्षणांत होते. ह्या चार अवस्थामधील मुख्य कोणती? पहिल्या तीन अवस्था 'परा, पश्यन्ती व मध्यमा' ह्या शरीरात अंतर्गतच होतात व फक्त वैखरी शब्दबाह्य शरीरांतुन व्यवहारात प्रगट होतो. पण, हे अगदी Automatic झाले असे त्याला व बाहेरच्या व्यक्तींनांही वाटते व त्यात कोणती ईश्वरी रचना आहे याचा विचार केला जात नाही!!

पण, त्यामुळे धर्मसंकल्पनांचे 'सत्य स्वरूप', अर्थ व उद्देश हेतू त्याचे 'सत्यज्ञान' ह्याची कल्पना जर त्या व्यक्तीला (सामान्य जनांना) व राजकारणी, विचारवंत व विद्वानांना व समाजाला चुकीची लाभली असली तर मग ''जनजीवनात अनावश्यक आणि अनाधिकृत लुडबुड व 'बाजारीकरण व राजकीय कवच', निर्माण व्हावयाला अडचण राहणार नाहीच.!!

मग प्रश्न हा आहे की ह्या गोंधळातील भागीदार म्हणजे "Stake Holder" कोण कोण आहेत? कुठल्या संकल्पनेचा खरा अर्थ बाबाबुवा, सामान्य व्यक्ति, राजकारणी, विचारवंत, विद्वानांनी व इतर जणांनी जाणला आहे?

ह्या सर्वांचे "Spirtu and moral Audit" करणे आवश्यक आहे. अत्यावश्यक आहे!! ह्या आध्यात्मिक, धार्मिक, नैतिकता, सत्यज्ञान, हेतूंची' 'लेखापाली' होणे अत्यावश्यक आहे.!!

ह्या दोन लेखकांनी या प्रकारचे पृथक्करण व त्यावर भाष्य केले आहे का? आपण त्याची वर्गवारी करू या. नमुन्यादाखल त्यांचे भाष्य बघू या.

### १) राजकारण Political

(A) ''त्यांच्या कारनाम्यांचा साधा सुगावादेखील सरकारी यंत्रणांना का लागत नाही?''

''१२ एकरावरील त्याच्या पंचतारांकित आश्रमात एक लााख लोक महिनाभर जेवण करू शकतील एवढा धान्यसाठा सापडला आहे. त्याच्या आलिशान आश्रमात सापडलेल्या गर्भनिरोधकांचे गूढ उकलण्यासाठी आता तपास यंत्रणा कामाला लागली आहे.''

''**स्वामी नित्यानंद** : 'माइंड बॉडी स्पिरिट' नावाच्या नियतकालिकाने जगातील सर्वांत प्रभावशाली १०० आध्यात्मिक गुरुंच्या मालिकेत बसवून गौरविले होते. २७ भाषांमध्ये ३०० पुस्तके लिहिणारा हा स्वामी वास्तव जीवनात मात्र 'भिकार चाळे' करणाराच निघाला''

### बाबासाहेब-योगगुरू

''राजकारणावरही आपल्या प्रभावाची मोहिनी घातली होती. राजकीय भाष्य करण्यातही नेहमी आघाडीवर असतो. देशाविदेशात पसरलेल्या 'हाय प्रोफाइल' भक्त गणांचा मोठा परिवार पाठीशी असल्याने रामदेव बाबा हे राकारणातील 'बडे प्रस्थ' ठरले असून अलीकडेच या संन्याशाला 'झेड प्लस' सुरक्षा पुरविण्यात आली आहे. जून २०११ मध्ये दिल्लीतील रामलीला मैदानावरील त्यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन मोडून काढण्यासाठी पोलीस फौजा दाखल होताच साडी नेसून बाबांनी पळ काढला होता....काळ्या पैशाच्या विरोधात उभ्या असलेल्या रामदेव बाबांनी करचुकवेगिरी केल्याचा, शेतकऱ्यांच्या जमिनी लाटण्याचा आणि वीजचोरी केल्याचा आरोप, 'तहलका' या नियतकालिकाने केल्यानंतर रामदेव बाबांच्या व्यवहारांभोवती गूढ वलय निर्माण झाले. रामदेव बाबांच्या ट्रस्टमार्फत चालविल्या जाणाऱ्या 'दिव्य फार्मसी' या औषध कंपनीतील औषध उत्पादनांमध्ये मानवी आणि प्राण्यांच्या हाडांचा वापर केला जात असल्याचा आरोप करून माकपच्या वृंदा करात यांनी खळबळ माजविली होती''.

### बाबा रामपाल

यांचे अनुयायी आणि आर्य समाजाचे कार्यकर्ते यांच्यातील संघर्षातूनच रामपालचे कारनामे उघड होत गेले.

स्वामी अग्निवेश या स्वामींनी चित्रवाणीवर गाजलेल्या 'बिग बॉस'च्या घरातही काही दिवस घालवले होते. समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनापासून फारकत घेतली. हजारे यांच्यावर कारवाई करावी असे सरकारमधील (UPA) एक वरिष्ठ व्यक्तीस सुचवितानाच्या त्यांच्या व्हिडिओमुळे जे वादाच्या भोवऱ्यात सापडले. हा व्हीडिओ बनावट असल्याचा बचाव अग्निवेश यांनी केला, पण त्यांना चौफेर टीका झेलावी लागली.

राजकारण्यांचे 'तांत्रिक गुरू'...चंद्रास्वामी - यांचे अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांशी घनिष्ठ संबंध होते. परकी चलन कायद्याच्या भंगप्रकरणी त्यांना सुमारे नऊ कोटींचा दंड भरण्याचा आदेश न्यायालयाने दिले होते.

डेरा सच्चा सौदा - डोळे दिपविणारी सांपत्तिक स्थिती असलेल्या ह्या धर्मगुरूने अवैध मार्गाने ३०० कोटीहून अधिक मालमत्ता जमविल्याचे आरोप आहेत.

श्री श्री रविशंकर -Art of Living 'योगी' ५०० कोटींहून अधिक मालमत्ता.

मोरारी बापू यांच्याकडे ३०० कोटींहून अधिक संपत्ती असल्याचे बोलले जाते. ही सारी संपत्ती दानाच्या स्वरूपात प्राप्त झाल्याचे सांगण्यात येते.

सत्यसाईबाबा यांच्या आश्रमावरही अशीच श्रीमंतीची झळाळी दाटलेली दिसते. अनेक बड्या नेत्यांचे गुरू असलेले माजी केन्द्रीय मंत्री शंकरराव चव्हाण यांनी केलेल्या पाद्यपूजा सोहळ्यामुळे महाराष्ट्राला अनुभवता आले. ४० हजार कोटींच्या घरात संपत्ती असावी असा अंदाज वर्तविला जातो.

**टेकचंद सोनवणे :**

आसारामजी भाजपचे एक बरे असते. १९९२ च्या लाटेनंतर भगवी कफनी घातलेल्या प्रत्येकाला भाजपने डोक्यावर घेतले. सध्या तुरुंगात असलेल्या आसारामचे नव्वदच्या दशकात मोठे प्रस्थ होते. साधारण १९९६-९७ मध्ये आसारामचे सातेक दिवस प्रवचन होते. त्यात संघ परिवारातील संघटना व शिक्षण संस्थांनी आसारामच्या चरणी लोळायचेच बाकी ठेवले होते.''

भाजपनेच नव्हे, तर काँग्रेसनेदेखील हेच केले. रामपाल हा काँग्रेस सरकारच्या भ्रष्ट कारभाराचा लाभार्थी आहे.

''सभोवती चमत्काराचे गूढ कवच निर्माण केले. त्यामुळे नोकरी मिळणे, जमिनीचा वादग्रस्त सौदा निकाली निघणे, अपत्यप्राप्तीसाठी अनेक भक्त रामपालच्या चरणी लीन होत असत.

भाजपचे एक बडे नेते, कैलाश विजयगौरी. लोकसभा निवडणुकीनंतर, हे महाशय घटनात्मक राजकीय पक्षांवर असलेल्या वीसेक जणांना घेऊन कुणा 'डेरा सच्च्या सौद्याच्या' बाबांना भेटायला गेले होते.''

**चमत्कार आणि धर्म व अध्यात्म**

आता आपण लेखकांचे धर्म, अध्यात्म व चमत्कार व त्याचा समाजमनावर होणार परिणाम यावरचे भाष्य पाहू या!!

अर्थातच हे त्यांच्यावर टीका करण्यासाठी नव्हे तर हा लेख वस्तुतः समाजाचे सद्यःकाळातील ज्ञान व विश्वास यांची पातळी दर्शवतो असे मी धरून त्याचा केवळ नमुना म्हणून बघतो आणि ह्यांचा उद्देश केवळ ''जनजीवनात अनावश्यक आणि अनधिकृत लुडबुड सुरू झाली आहे, हे मत व भोंदू भगवान व भोळे भक्त'' हे दिनेश गुणे ह्यांचे निष्कर्ष व दुसरा लेख ''श्रद्धेच्या बाजारीकरणाला, राजकीय कवच,'' हे टेकचंद सोनावणे ह्यांचे विधान आणि ह्यांचा सर्वांचा धर्म, बुवाबाजी, राजकारण, समाजकारण, अर्थनियंत्रण, अध्यात्म (स्पिरिच्युॲलिटी) ह्या संकल्पनेबद्दल गोंधळलेले समाजज्ञान व सत्यज्ञानाच्या आग्रहाबद्दल केवळ सोयीस्कर मौन का, हे शोधण्याचा प्रयत्न करतो आहे!!

पृथ्वीवरील मानवी जीवन हे आज भौतिकवाद, भौतिक विज्ञान, Commercialism म्हणजे बाजारीकरण सत्य वैश्विक सत्याच्या ज्ञानाबद्दल व मानवी अस्तित्वाच्या सत्य पातळीबद्दल अज्ञान, व वेदिक व भारतीय संस्कार ज्ञानाबद्दल विस्मृती ह्या अनेक कारणांनी भारलेले आहे. गोंधळात पडले आहे! मानवी संस्कृतीबद्दल व त्याच्या भारतीय जाणिवेबद्दल असहिष्णू व पूर्वग्रहदूषित आहे. अनुत्सुकही आहे!!

ह्या जगात संघर्ष आहे तो मानवी समाजात. याला अध्यात्मशास्त्रात सत्व, रज, तम, या त्रिगुणांच्या द्वैत पक्षांचा संघर्ष किंवा सुर-असुर किंवा देव, दानव व दैत्य यांचा संघर्ष ह्या चष्म्यातून किंवा 'प्रिझम' मधून बघत नाही आहे हे खरे कारण आहे!!

महाभारत व गीताज्ञान हे जुनाट नाही व irrelavent गैरलागूसुद्धा नाही. ते तर Efernal Knowledge म्हणजे अनंतातले चिरतत्त्वज्ञान व कथा आहे. त्यातले प्रसंग व संदर्भ यांची युगायुगातील भाषा बदलते, पण बीजज्ञानात ती सनातन युगातील लढ्याचीच नूतन आवृत्तीतील '**कारण भावांची**' मूळ सत्ये आहेत हे लक्षात येऊ शकेल!!

मानवी मन, बुद्धी, हृदय, शरीरे ह्यांच्या क्षमतेपलीकडे जेव्हा मानवातील स्वभाव, प्रकृती ही प्रचलित नीतिमूल्ये लाथाडते तेव्हा समाजात दोन किंवा अनेक पक्ष व बाजू घेतल्या जातात व महाभारतासारखा युद्धाचा प्रसंग येतो.

तेव्हा हे प्रश्न व संघर्ष सोडवू शकत नाहीत व अर्जूनविषादयोगासारखी परिस्थिती उद्‌भवते!!

ह्याचे कारण मानवी Consciousness ची पातळी

---

कधीकधी आपण ज्यांच्यावर खूप प्रेम करतो तीच माणसं आपल्यापासून फार दूर जातात.

उंचावल्याखेरीज त्याचे उत्तर मिळत नाही. ही पातळी अर्जुन व कृष्ण यांच्या गीतासंवादातून भेद सांगितलेला आहे पण हे 'युद्ध' नाकारून चालत नाही, कारण दोन्ही बाजूंनी ज्ञानाची, जीवनदृष्टीची, नैतिकतेची, व्यवहाराची पातळी संपूर्ण समाजाच्या क्षेत्रामध्ये उंचावायला लागते. मग, कुरुक्षेत्री महायुद्ध हा जीवनमरणाचा खेळ खेळावाच लागतो. कारण हा खेळ युद्धाचा अनिवार्य पर्याय पत्कारण्यावरच भविष्यातील नवीन ज्ञानाचा व चैतन्य प्रज्ञेचा प्रकाश पसरतो. ईश्वर श्रीकृष्णाच्या अवतारात ह्याचा संदर्भ वासुदेव व पुरुषोत्तम योग, ह्या उंचावलेल्या पातळीचा उलेख करतात. तो कुरुक्षेत्रावरील युद्धाचा पण, ''मामनुस्मर युद्ध्यच'' हा धर्मक्षेत्रातील योग युद्धाचा व प्रगतीचा!! ही प्रगती केवळ, जन्मजन्मांतरीच प्राप्त होते. आजही पृथ्वीवर तिसरे न्यूक्लिअर युद्ध किंवा आतंकवाद्यांनी Terrurisuy केलेली Genocides पाहावयाला लागतात.

**समाजाचे दुःख**

आपल्या सध्याच्या बाबा-बुवा विरुद्ध भोळा भाविक समाज हा आपल्या सुखदुःखाच्या प्रापंचिक प्रश्नांना उत्तरे शोधत असतो. राजसत्ता व लोकसत्ताही ती उत्तरे देऊ शकत नाहीत. त्या वेळेला लक्षात येते की वैयक्तिक नीतिमत्ता गमावलेले मानव, राजसत्ता, अर्थसत्ता किंवा बाहुबल सत्ता ह्यांचा वापर करून आपले स्वार्थ संभाळत असतात. ते उघडपणे न करता प्रचलित अज्ञानी 'Systems' चा कायदा वापरून दुर्बल जनतेला फसवत असतात. त्यांना प्रचलित धर्म Organised Religions, Rituabistic Relegions मध्ये उत्तरे नसतात तर ती Integral म्हणजे पूर्ण योग व 'अध्यात्म' म्हणजे Evolutionary Spiritualism मध्ये असतात. अशा ज्ञानाकडे समाज विचारवंत हेसुद्धा पांडवांसारखेच अज्ञानी व भौतिकवादात मर्यादित ज्ञानाचे अधिकारी असतात. त्यांना ही परिस्थिती बदलावी, ही फसवणूक थांबावी, हे शोषण थांबावे, हा बद्दल राजसत्तेत वा लोकसत्तेत व्हावा असे मनोमन वाटते.

**पण तसे होत नाही!!**

कारण हा बद्दल खऱ्या आध्यात्मिक उत्क्रांतीचा आहे!! मग अडचण काय आहे?

ह्या प्रश्नांच्या उत्तराकरिता आपले प्राप्त ज्ञान, तत्त्वज्ञान, अंतःकरण चतुष्ट्य (चित्त, बुद्धी, मन, अहंकार) ह्यांतील सत्य परिस्थिती तपासावे लागते. समाजातील ह्या ज्ञानाच्या संस्थांचे कार्य चालू आहे की नाही हे तपासावे लागते. त्या Consciousness च्या पातळीवरचा बद्दल करणारे तत्त्वज्ञान शोधावे लागते. हे सध्याच्या भौतिक स्वरूपाच्या धर्म व मूल्यांवर सापडत नाही.

उदाहरणार्थ भारतापुरते पाहावयाचे झाले तर भारतीय समाजाला वेदिक धर्म, वेदान्त, बुद्धधर्म, जैनधर्म ह्यांतील फरक माहीत नाही. तो अशा अर्थाने की ह्या धर्मांचा वापर सांप्रदायिक बंदिस्तीमध्येच फक्त चालू आहे. ह्या धर्मांचा फरक व सत्यता ही Spiritual Audit म्हणजे Creator च्या वैश्विक Systems वर आधारलेले आहे का हे तपासलेले नाही. ''सर्व धर्म समभाव' हा Liberali म्हणजे उदारमतवाद धरला तरी तो प्राथमिक पातळीवर कदाचित योग्य असेल, पण सत्य धर्म आचरणावर आधारलेल्या "Spiritual Consciousness" च्या प्रगतीला पुरेसा नाही.

**त्याचे एक उदाहरण पाहू या.**

या पृथ्वीवरील जीवनाला भौतिक मर्यादा असल्या तरी त्या जीवनाला म्हणजे शरीरबद्ध जीवात्म्याला ह्या पलीकडे उंचीवर आपली पातळी नेण्याची क्षमता योगमार्गाने आहे. ती पात्रता मिळवण्याकरिता त्याला काही बदल-चित्त, मन, बुद्धी व अहंकारामध्ये परिवर्तन करावयाला लागते.

परंपरागत प्रचलित अद्वैत तत्त्वज्ञानात त्याला ह्या जगावरील अस्तित्व नाकारण्याचा सल्ला मिळतो. त्यामुळे, धर्म मार्ग किंवा अध्यात्ममार्ग पृथ्वीवरील जीवनाला असत्य मानायला लागतो.

खरे अध्यात्म ह्या जगाला योगाची प्रयोगशाळा मानते त्यामुळे योगमार्गाने म्हणजे ईश्वरानेच सांगितलेल्या ''पुरुषोत्तम योगाची'' साधना करावयाला लागते.

ह्या मार्गाची चांगली माहिती महायोगी अरविंद हे Esays on व Gita Synthesis of Yoga ह्यामध्ये देतात.

पण ह्याखेरीज श्री १०८ स्वामी विष्णुतीर्थ महाराज आपल्या ''प्राणतत्त्व'' ह्या पुस्तकात काय म्हणतात ते पाहू या (प्राणतत्त्व : योगश्री पीठ ट्रस्ट (प्रकाशन) मुनि-की-रेती, योग ऋषिकेश - २४६२०१ जिल्हा टिहरी, गढवाल, उ.प्रदेश)







## हे जग सत्य की काय?

''परम पूज्यपाद शंकर (आद्य शंकराचार्य) ने ऐसे सब शब्दों का अर्थ ब्रह्मपरक किया है।

हमारा पूज्यपाद से केवल इतना ही मतभेद है कि प्रस्थानत्रयी में जगत को रज्जू-सर्पवत, कहीं भी नहीं दिखाया गया वरन् सर्वत्र उसका सृजन-क्रम ही दिया है।

सर्प की भ्रांति में किसी क्रम की संभावना नहीं। यदि सृजन-क्रम स्वीकार किया जाता है, तो उम क्रम में किसी एक तत्त्व का विकार परिणाम मानना पडेगा। श्वेतकेतु और



**आद्य शंकराचार्य**

उसके पिता के संवाद मे विचारम्भण किकारो नामश्रेय वाक्य का विकार शब्द स्पष्टतया किसी तत्त्व के परिणामगत विकारों की ओर संकेत कर रहा है - जैसे, मृत्तिका से घट।

**इस प्रकार की सृष्टि मे परिणामक्रम अनिवार्य है।**

ब्रह्म अपरिणामी है। इसलिये वह परिणाम किसी अन्य तत्त्व मे होना चाहिऐ जो ब्रह्म से ही उत्पन्न हुआ है।

यापुढे विष्णुतीर्थ महाराजांनी अनेक पुरावे देऊन हे जग मिथ्या किंवा भ्रम नसून, ब्रह्मशक्तीने सत्य म्हणूनच जगाची निर्मिती झाली आहे व त्या जगातील प्राणी हे जरी मर्त्य शरीरे धारण करत असले तरी त्यांचे जीवात्मे ह्याचे वैश्विक युनिव्हर्सिटीमध्ये आपल्या आत्म्याची उंची कमीतकमी ''वासुदेव'' ह्या पातळीपर्यंत उद्धारु शकतात व त्यापुढे भगवद्‌गीतेतील ''पुरुषोत्तम योग'' ह्या क्रियायोगाने परमात्याच्या अंतिम पातळीपर्यंत उंचावू शकतात. त्याकरिता, विश्वाच्या अज्ञान व गूढ अशा जन्मपुनर्जन्म किंवा आखलेल्या मार्गाने जाऊ शकतात.

त्यामुळे जर मातीपासून मडके तयार करण्याची कृती कुंभार करू शकतो तर त्या जगात मानव की जो 'Being' म्हणून जन्माला येतो तो 'Becoming' या क्रियेला साधन करून आपली आध्यात्मिक उन्नत्ती करु शकतो.

त्यामुळे ह्याच तर्काने अंधारात जरी दोरीला सर्प समजण्याचा भ्रम पैदा झाला तसे ह्या जगाला मिथ्या मानून


पाठ फिरवणे हा मार्ग नसून, एक परिवर्तनाचा मार्ग पत्करला पाहिजे. ही उन्नतीसुद्धा इतर जीव, जीवाणू, चैतन्यप्राणी जे प्राणशक्तीवर अस्तित्वात आहेत ते सर्व सहकार्याने (व्यष्टि, समष्टि, सृष्टि, परमेष्टि) समाजाची आत्मिक पातळी उंचावू शकतात. त्यामुळे नवीन सत्यजीवनमूल्ये प्राप्त होऊन जगामध्ये 'सत्ययुग', रामराज्य, 'सामराज्य' यांचा उदय होऊ शकतो.

धर्म ह्या संकल्पनेची समाजाच्या उन्नतीकरिता आवश्यकता आहे, भौतिक पातळीवर तुलनेने पण ह्या दोन्ही लेखांत धर्मावरची श्रद्धा ही फसवी आहे, भोळी आहे हे उत्तमपणे सांगितले आहे.

पण जर धर्म हा उपाय नसेल तर 'उन्नती' केवळ समाजाच्या बुद्धीवर आधारलेल्या मार्गाने होते असा अर्थ निघतो. पण ह्या बाबतीत ही बुद्धीसुद्धा गुण प्रकृतीच्या अवनतीमुळे सात्त्विकेपासून च्युत होऊन, अवैध मार्गांना, भ्रष्टाचारालाही मान्यता देते (उदा. क्रिकेटमध्ये )

मग समाजाच्या Social Science ह्यातील कुठल्या मार्गाने समाजाची सुधारणा होते?

हा प्रश्न मोठा आहे, पण त्याचे उत्तर भौतिकवादाने होत नाही हे जगाने पाहिले आहे.




या चर्चेसाठी आपल्याला दिशाच्या पुढील लेखांची वाट पहावी लागेल.

त्यामध्ये आपण श्री. किशोर गांधी यांच्या **"Social Philosophy of Sri Aurobindo and The New Age'** ह्या पुस्तकाचा विचार करुया !!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

●●●

---

(पृष्ठ क्र. ५ वरून - **यिंचुआन: एक प्रगतीशील शहर**)

यिंचुआन शब्दाचा अर्थ चांदीची नदी असा होतो. या शहराजवळून यलो नदी वाहते. त्या नदीला कालवे काढून सर्वत्र पाणी खेळविले आहे. त्यामुळे मूळची रेताड जमीन सुपिक झाली आहे. भाजीपाला आणि फळे येथे मोठ्या प्रमाणावर पिकतात. १० व्या शतकात शिया राजाने या शहरात आपली राजधानी आणली. तेव्हापासून शहराचा विकास होऊ लागलेला आहे. अजूनही विकास चालूच आहे. लवकरच यिंचुआन हे एक प्रगत शहर म्हणून नावारूपाला येईल यात शंका नाही.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# पहिले महायुद्ध - एक शतक पूर्ण

*मानवी इतिहासातील पहिल्या अतिसंहारक युद्धास १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने - संपादक*

पहिल्या महायुद्धास ४ ऑगस्ट २०१४ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. या महायुद्धात मित्र राष्ट्रे (Allied Powers) व युरोपातील केंद्रीय राष्ट्रे (Central Powers) या दोन गटांत संघर्ष झाला. मित्र राष्ट्रांच्या गटात इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इटली, अमेरिकेची संयुक्त संस्थाने इत्यादी राष्ट्रांचा सहभाग होता तर केंद्रीय राष्ट्रांच्या गटात प्रामुख्याने जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी व तुर्कस्तान या तीन देशांचा समावेश होता. जसजसे युद्ध पुढे सरकत होते तसतसा मित्र राष्ट्रांच्या गटात इतर अनेक राष्ट्रांचा समावेश होत गेला.

इतिहासकारांच्या मते १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून ते २० व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत म्हणजे जवळजवळ शंभर वर्षांच्या कालावधीत युरोपातील प्रमुख राष्ट्रांना मोठे युद्ध टाळण्यात यश आले होते. यामध्ये सत्तेचा समतोल (Balance of Power) या तत्त्वाचा फार उपयोग झाला होता. या तत्त्वानुसार वेगवेगळ्या देशांचे गट निर्माण होत व अशा अनेक गटांतील देश एकमेकांचा गट वा मित्र सोडून इतर गटांमध्ये सामील होत. यामागचे कारण एकच होते व ते म्हणजे कुठल्याही एका देशाला प्रमाणाच्या बाहेर बलवान वा ताकदवान होऊ न देणे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इटली व जर्मनीच्या एकीकरणानंतर युरोपातील राजकारणात व युरोपियन सत्तांच्या परराष्ट्र धोरणात मोठया प्रमाणात बदल घडून येऊ लागले असे जाणवते. इ. स. १८७१ मध्ये ऑटो व्हॉन बिस्मार्क या प्रशियाच्या पंतप्रधानाच्या व कैसर विल्यम पहिला या प्रशियन राजाच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण झाले जे युरोपात जर्मनी या अजून एका बलाढ्य राष्ट्राची भर पडली. हे तेच राष्ट्र होते जे अवघ्या काही कालावधीतच परंपरागत बलाढ्य मानल्या जाणाऱ्या युनायटेड किंगडम (इंग्लंड) व फ्रान्स या राष्ट्रांना निव्वळ शहच नव्हे तर मोठे आव्हान उभे करणारे होते व ते आव्हान त्याने पहिल्या महायुद्धाच्या (१९१४-१८) स्वरूपात उभे केलेले दिसते.

१९ व्या शतकातील युरोपचे अजून एक वैशिष्ठ्य म्हणजे या शतकात राष्ट्रवादाचा प्रसार झालेला आढळतो व याचीच परिणती म्हणजे इटलीचे व जर्मनीचे एकिकरण होय. राष्ट्रवादाची भावना जोपासल्यामुळे पश्चिम युरोपातील देशांतील नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळून संसदीय प्रणाली (लोकशाही) अजून सुदृढ होण्यास मदत झाली. मात्र या राष्ट्रवादाच्या भावनेच्या प्रसारामुळे ऑस्ट्रीया-हंगेरी, रशिया व तुर्कस्तान (ऑटोमन साम्राज्य) या देशांच्या पूर्व युरोपातील साम्राज्यांना धक्का लागल्याचे दिसते. हे तिन्ही देश आग्नेय युरोपातील बाल्कनच्या द्वीपकल्पात (Peninsula) वसलेल्या 'स्लाव' वंशातील गटांच्या लोकांवर राज्य करत होते. येथील देशांवर सुरुवातीला प्रामुख्याने तुर्कस्तानचे वर्चस्व होते. मात्र इ.स. १८२१ ते १९१३ या कालावधीत ग्रीस, मॉंटेनिग्रो, सर्बिया, रोमानिया, बल्गेरिया, अल्बेनिया, इत्यादी राष्ट्रे स्वतंत्र झाली व ती सीमाप्रश्नावरून आपापसात लढत होती. ऑस्ट्रिया-हंगेरी व रशियाने बाल्कन राष्ट्रांमधील या तंट्यांचा फायदा घेऊन तेथे आपला प्रभाव वाढविण्याचे धोरण अवलंबिले.

सर्बिया या बाल्कन राष्ट्राने त्या परिसरातील सर्व 'स्लाव' (वर नमूद केलेल्या) वंशाच्या देशांची मोट बांधून त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. रशिया या सर्वांत

प्रबळ 'स्लाव' देशाचा सर्बियाच्या या प्रयत्नांना पाठिंबादेखील होता. परंतु सर्बियाच्या या 'स्लाव' वंशातील लोकांमध्ये (देशांमध्ये) राष्ट्रवादाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांना ऑस्ट्रिया-हंगेरीचा विरोध होता कारण लाखो 'स्लाव' वंशीय लोक ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्याचे घटक होते व त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाल्यास त्याचा फटका वा झळ निश्चितच ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्याला बसणार होती. इ. स. १९०८ साली ऑस्ट्रिया-हंगेरीने बाल्कन प्रदेशातील बोस्निया-हर्जेगोव्हिना हा प्रांत ताब्यात घेऊन रशिया व सर्बियाला खिजवले. सर्बियाला बोस्निया-हर्जेगोव्हिनावर आपले नियंत्रण असावे असे वाटत होते कारण तेथे मोठ्या प्रमाणात 'सर्ब' लोक राहत होते. या सर्व पार्श्वभूमीवर बोस्निया-हर्जेगोव्हिनात ऑस्ट्रिया-हंगेरीच्या विरोधात मोठ्या प्रमाणात असंतोष धुमसत होता.

ऑस्ट्रिया-हंगेरीचा राजपुत्र व गादीचा वारसदार फ्रान्ज फर्डिनांड याला वाटले की, बोस्निया - हर्जेगाव्हिनात जाऊन आपणास 'स्लाव' वंशाच्या लोकांविषयी आत्मीयता आहे हे दाखवावे. या हेतूने फ्रान्ज फर्डिनांड याने आपली पत्नी सोफिया हिच्यासोबत बोस्निया-हर्जेगोव्हिनाचा दौरा आखला.

२८ जून १९१४ या दिवशी हे दांपत्य बोस्निया - हर्जेगोव्हिनाची राजधानी सारायाव्हो (Sarajevo) च्या रस्त्यांवरून आपल्या गाडीतून जनतेला अभिवादन करीत जात असताना एका मारेकऱ्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या व त्यांचा तत्काळ मृत्यू झाला. हा मारेकरी बोस्नियात राहणारा असून त्याचे नाव गॅव्हरिलो प्रिन्सिप असे होते. ही घटना म्हणजे पुढे येणाऱ्या पहिले महायुद्ध या झंझावाती वादळाची नांदी होती. म्हणूनच इतिहासकारांनी या घटनेस यथार्थाने पहिल्या महायुद्धाचे तात्कालिक कारण असे संबोधले आहे. या घटनेनंतर ऑस्ट्रिया-हंगेरीला सर्बियाच्या विरोधात चांगलेच कोलीत मिळाले कारण सर्बिया या परिसरातील सर्व 'स्लाव' वंशीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्याचे काम करत होता व गॅव्हरिलो प्रिन्सिप या फ्रान्ज फर्डिनांड व सोफिया या दांपत्याची हत्या करणाऱ्या मारेकऱ्याचा 'ब्लॅक हँड' या सर्बियन अतिरेकी गटाशी संबंध होता.

ऑस्ट्रिया-हंगेरीने या घटनेचा बदला म्हणून २३ जुलै १९१४ रोजी सर्बियाला अगदी अपमानास्पद व मानहानीकारक मागण्या सादर केल्या. सर्बियाने या मागण्यांपैकी अनेक मागण्या मान्य केल्या मात्र काही मागण्यांविषयीचा तोडगा आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून काढू अशी भूमिका घेतली. ऑस्ट्रिया-हंगेरीने सर्बियाच्या या मागणीला धूडकावून लावून २८ जुलै १९१४ रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध जाहीर केले. त्यापूर्वी ऑस्ट्रिया - हंगेरीने, सर्बिया विरोधातल्या संभाव्य युद्धात जर्मनीच्या पाठिंब्याचे वचन घेतले होते. फ्रान्ज फर्डीनांडच्या हत्येनंतर संभाव्य तंटा टाळावा या दृष्टीने युनायटेड किंगडमने आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून या समस्येवर तोडगा काढावा असे सुचविले होते; परंतु जर्मनीने हा ऑस्ट्रिया-हंगेरी व सर्बिया या दोन देशांमधील विषय आहे ही भूमिका मांडून आंतरराष्ट्रीय परिषदेच्या कल्पनेला विरोध दर्शविला.

दरम्यान, रशियाने सर्बियाच्या बाजूने उभे ठाकण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी फ्रान्स या युरोपातील बलाढ्या राष्ट्राचा पाठिंबा मिळविला. ३० जुलै १९१४ रोजी रशियाने ऑस्ट्रीया-हंगेरीच्या सीमांवर रशियन सैनिकांच्या हालचालींना सुरुवात केली व याला प्रत्युत्तर म्हणून जर्मनीने रशिया विरुद्ध १ ऑगस्ट १९१४ रोजी युद्धाची घोषणा केली. त्यानंतर फ्रान्सने पाठिंबा दर्शविला. त्यामुळे फ्रान्सवर हल्ला करण्याच्या इराद्याने जर्मनीने बेल्जियम पादाक्रांत केला कारण फ्रान्सपर्यंत पोचण्यासाठी बेल्जियम पार करणे आवश्यक होते. बेल्जियमसारख्या तटस्थ राष्ट्रावर जर्मनीने हल्ला केला म्हणून युरोपातील दुसरे बलाढ्य राष्ट्र युनायटेड किंगडमने ४ ऑगस्ट १९१४ रोजी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली व अशारितीने ४

ऑगस्ट १९१४ रोजी जग एका मोठ्या युद्धाच्या खाईत लोटले गेले. इतिहासकारांनी इंग्रजीत याला यथार्थपणे ग्रेट वॉर (Great War) असे संबोधले आहे. ग्रेट वॉर या इंग्रजी शब्दाचे मराठीत भाषांतर महायुद्ध असे होते.

पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीस या युद्धात सहभागी झालेल्या व इतर राष्ट्रांनादेखील हे युद्ध युरोपातील भूतकाळातल्या युद्धांप्रमाणे लवकर संपेल असे वाटले होते; मात्र काही महिन्यांतच या सर्व राष्ट्रांना जाणवले की, हे युद्ध युरोपच्या व जगाच्या इतिहासातील न भूतो न भविष्यति असे होणार आहे. (अपवाद फक्त दुसऱ्या महायुद्धाचा इ.स. १९३९-१९४५ सोडला तर)

४ ऑगस्ट १९१४ रोजी युनायटेड किंगडमच्या सहभागानंतर खऱ्या अर्थाने सुरू झालेले हे पहिले महायुद्ध - ११ नोव्हेंबर १९१८ पर्यंत म्हणजेच चार वर्षे तीन महिने व सात दिवस एवढा प्रदीर्घ काळ चालले. या युद्धात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या जगातील अनेक देशांचा सहभाग होता म्हणून या युद्धास जागतिक युद्ध असेही संबोधले जाते.

मित्र राष्ट्रांच्या गटात युनायटेड किंगडम, फ्रान्स व अमेरिकेची संयुक्तसंस्थाने या प्रमुख राष्ट्रांव्यतिरिक्त रशिया, बेल्जियम, ब्राझील, चीन, कोस्टारिका, क्यूबा, ग्रीस, ग्वाँटेमाला, हैती, होन्डुरास इटली, जपान, लायबेरिया, माँटेनिग्रो, निकारगुआ, पनामा, पोर्तुगाल, रोमानिया, सॅन मॅरिनो, सर्बिया, सियाम इत्यादी देशांचा समावेश होता तर केंद्रीय सत्तांच्या (राष्ट्रांच्या) गटात ऑस्ट्रिया-हंगेरी, जर्मनी व तुर्कस्तान या प्रमुख राष्ट्रांव्यतिरिक्त बल्गेरिया या राष्ट्राचादेखील समावेश होता.

पहिल्या महायुद्धाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हे जगाच्या इतिहासातील असे युद्ध होते की जे जमीन, पाणी व अवकाशात लढले गेले या महायुद्धात विमान (अवकाश), पाणबुडी (पाणी-समुद्राच्या खालून), रणगाडे (जमीन), मशीनगन (जमीन) इत्यादी आधुनिक शस्त्रास्त्रांचा मोठ्या प्रमाणात वपार करण्यात आला. तसेच सैनिक शस्त्रु विरुद्ध खंदकांतूनदेखील लढत होते व या युद्धात दारुगोळ्याचा खूप प्रमाणात वापर झाला.

पहिल्या महायुद्धातील दोन नाट्यमय घटना म्हणजे रशियाची युद्धातून माघार व अमेरिकेची संयुक्त संस्थाने (अमेरिका) या देशाचा युद्धात सहभाग या होत. फेब्रुवारी १९१७ मध्ये रशियातील झारशाहीच्या विरोधात पहिली क्रांती झाली व नवीन सरकारची स्थापना झाली आणि ऑक्टोबर १९१७ मध्ये बोल्शेविकांचा रशियन साम्यवादी नेता व्लादिमीर लेनिन याने दुसरी क्रांती घडवून आणली. या क्रांतीस बोल्शेविक किंवा साम्यवादी क्रांतीदेखील म्हटले जाते. लेनिनने जर्मनीसोबत ब्रेस्ट लिस्टॉस्क (Brest-Litovsk) चा तह ३ मार्च १९१८ ला केला व रशियाने पहिल्या महायुद्धातून माघार घेताली. याचाच अर्थ ज्या रशियाने पहिल्या महायुद्धाची सुरुवात करण्याात महत्त्वाची भूमिका बजावली तो महायुद्ध संपेपर्यंत युद्धातून बाहेर पडला होता. १९१७ या वर्षाच्या सुरुवातीपासूनच जर्मनीने युनायटेड किंगडमला समुद्रमार्गाने इतर देशांशी सुरु असलेल्या व्यापाराचा व रसदीचा तुटवडा निर्माण करावा या हेतूने अनेक देशांची जहाजे बुडविण्याचा सपाटा लावला. याचा फटका अमेरिकेच्या संयुक्तसंस्थानांच्या व इंग्लंडच्या अनेक जहाजांना बसला. याच जहाजांमध्ये 'ल्युसिटानिया' या जहाजाचादेखील समावेश होता. जर्मनीच्या या कृत्यांची झळ अमेरिकेतील सामान्य जनतेलादेखील बसण्यास सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही व त्यामुळेच पहिल्या महायुद्धात (अमेरिकन जनतेच्या मते युरोपियन युद्धात) सहभाग नको या त्यांच्या मतात बदल होऊन अमेरिकन जनतेने मित्र राष्ट्रांबद्दलची सहानुभूती वाढली. जर्मनीच्या या उपद्व्यापांना वैतागून वा कंटाळून म्हणा, अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी २ एप्रिल १९१७ रोजी जग लोकशाहीवादी राष्ट्रांसाठी सुरक्षित असले पाहिजे, हे मत मांडून जर्मनीविरुद्ध युद्धाची हाक दिली. त्यानुसार दिनांक ६ एप्रिल १९१७ रोजी अमेरिकेच्या संसदेने

जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली व अमेरिकेने पहिल्या महायुद्धात उडी घेतली.

पहिल्या महायुद्धाने पूर्ण जगाचे व प्रामुख्याने युरोपचे राजकीय व सामाजिक वातावरण ढवळून टाकले. पहिल्या महायुद्धादरम्यान व युद्धानंतर तत्काळ रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, इस्टोनिया, लॅटव्हिया, लिथुआनिया असे अनेक नवीन देश अस्तित्वात आले. तुर्कस्तानचे साम्राज्य खऱ्या अर्थाने अस्त पावले.

अनेक लोकांनी युद्धकाळात आपली घरदारे सोडून पळ काढला होता व नंतर तेथे गेल्यावर ती घरे अस्तित्वातच नाहीत असे त्यांना जाणवले. अनेक जुन्या देशांचे विभाजन होऊन नवीन देश अस्तित्वात आल्याने बऱ्याच लोकांना आपण नेमक्या कोणत्या देशाचे नागरिक आहोत हे कळत नव्हते. त्यामुळे लाखो लोक विस्थापित व आश्रित म्हणून राहत होते. या युद्धानंतर युरोपातील अनेक देशांतल्या ग्रामीण भागात राहणारे लोक मोठ्या प्रमाणात शहरांत येऊन राहू लागले. त्यामुळे नागरिकरणाची प्रक्रिया वेगाने वाढली.

पहिल्या महायुद्धादरम्यान सैनिक व नागरिक धरुन लाखोंच्या वर मनुष्यहानी झाली आणि युद्धात सहभागी झालेल्या बहुतांश देशांतील तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली कारण अनेक तरुण सैन्यात दाखल झाले होते व त्यांचा युद्धादरम्यान मृत्यू झाला होता. एवढ्या मोठ्या मनुष्यहानीचा युरोपातील अनेक देशांतल्या लोकांना मानसिक धक्का बसला होता.

जानेवारी १९१९ मध्ये पहिल्या महायुद्धात विजयी झालेल्या देशांचे प्रतिनिधी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे जमले. त्यांत ३२ देशांतील प्रतिनिधींचा समावेश होता व पॅरिसच्या या ऐतिहासिक शांतता परिषदेत व्हर्सायिचा तह जर्मनी सोबत(Versailles) , सेंट जर्मेनचा तह (St.-Germain) ऑस्ट्रियासोबत, न्युयीलीचा तह (Neuilly) बल्गेरियासोबत, ट्रियानोनचा तह (Trianon) हंगेरीसोबत व सेव्हरसचा तह (Severs) तुर्कस्तानच्या साम्राज्यासोबत हे प्रमुख तह करण्यात येऊन पहिल्या महायुद्धाची खऱ्या अर्थाने सांगता झाली.

या युद्धानंतर जगात या प्रकारचे भयंकर युद्ध होऊ नये यासाठी प्रयत्न झाले व त्याकरता राष्ट्रसंघाची (League of Nations) ची स्थापना झाली. मात्र काही जाणकार म्हणतात, इतिहासाची पुनरावत्ती होत असते. अशी पुनरावृत्ती भूतकाळातील चुकांमधून शहाणपण न सुचल्यास होते. त्यामुळेच पहिल्या महायुद्धानंतर अवघ्या २० वर्षांच्या कालावधीतच जगातील दुसऱ्या अतिसंहारक युद्धाची सुरुवात झाली व हे युद्ध म्हणजे दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) हे होय. परंतु या दुसऱ्या महायुद्धानंतर आजतागायत तिसरे महायुद्ध झालेले नाही. याचा अर्थ मानवाने पहिल्या व दुसऱ्या महायुद्धातून धडा घेतला आहे काय? हा प्रश्न उपस्थित होतो व या प्रश्नाचे उत्तर आपण शोधावयास हवे.

**संदर्भ सूची -**


रॅम अगाथा - युरोप इन द व्टेंटीयथ सेंच्युरी (१९०५ - १९७०)

लिप्सन इ. - युरोप (१९१४ - १९३९)

राव बी. व्ही. - हिस्ट्री ऑफ मॉडर्न युरोप (१७८९ - १९६०)

थॉमस पी. सी.- हिस्ट्री ऑफ युरोप (१७८९-१९४५)

ग्रँट व टेम्परली - युरोप इन द नाइन्टीन्थ अँड व्टेंटीयथ सेंच्युरीज्

साऊथगेट जी. डब्ल्यू. - मॉडर्न युरोपियन हिस्ट्री (१७८९-१९६०)

स्टोन नॉर्मन - युरोप ट्रान्सफॉर्म्ड (१८७८ - १९१९)

मेसन डेव्हिड - अ कन्साइज हिस्ट्री ऑफ मॉडर्न युरोप

द वर्ल्डबुक एनसायक्लोपिडिया



**सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.


●●●

ज्या दिवशी आपली थोडीही प्रगती झाली नाही तो दिवस फुकट गेला असं समजा.

# भारतीय इंग्रजी साहित्याचे ज्येष्ठ साहित्यकार डॉ. एम. के. नाईक

*भारतीय इंग्रजी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, लेखक, कवी, समीक्षक व सिद्धहस्त इतिहासकार प्रा. डॉ. एम. के. नाईक यांचे दि. ६ नोव्हेंबर २०१४ रोजी वृद्धापकाळामुळे निधन झाले. डॉ. एम. के. नाईक यांच्या संशोधनक्षेत्रातील भगीरथ प्रयत्नांवर प्रकाश टाकणारा हा विशेष लेख. - संपादक*

भारतीय इंग्रजी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक, लेखक, कवी, समीक्षक व सिद्धहस्त इतिहासकार प्रा. डॉ. एम. के. नाईक यांचे दि. ६ नोव्हेंबर २०१४ रोजी वृद्धापकाळामुळे निधन झाले. वयाच्या नव्वदीतदेखील पुस्तकलेखनाची अव्याहत परंपरा कायम ठेवणारे एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व असा त्यांचा लौकिक होता. त्यांच्या नावावर चाळीस पुस्तके आहेत.

डॉ. एम. के. नाइकांची एका वाक्यात ओळख करून द्यायची झाल्यास, "History of Indian English Literature या साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे लेखक'' अशी करता येईल. हे पुस्तक १९८२ साली प्रकाशित झाले. मात्र नुकतीच याची २४ वी पुनरावृत्ती प्रकाशित झाली. साहित्येतिहासाच्या प्रकाशनाचा हा उच्चांकच म्हणावयास हरकत नाही. या एकाच बाबीवरून या ग्रंथाचे श्रेष्ठत्व व त्याची भारतीय इंग्रजी साहित्याच्या अभ्यासकांना असलेली उपयुकतता लक्षात येते.

पुण्यामधील माझ्या उमेदवारीच्या काळात यूजीसीच्या "The Influence of Ramayana and Mahabharata on Indian English Literature" या संशोधनप्रकल्पावर रिसर्च फेलो म्हणून मी काम करत होतो. त्या वेळी एका परिसंवादात माझी नाईकसरांशी ओळख झाली. आपल्या आजोबांच्या वयाच्या असलेल्या, पण आपली प्रज्ञा व प्रतिभा अप्रतिहत ठेवणाऱ्या या ज्ञानर्षींच्या व्यासंगाकडे पाहून मी स्तिमित झालो. त्याच्या घरी जाण्याचा, मुलाखत घेण्याचा योग खूप वेळा आला. त्यांची लेखनाबद्दलची ओढ पाहून मी खूप प्रभावित झालो.

प्रा. डॉ. एम. के. नाईक यांनी कर्नाटक विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली व तेथेच इंग्रजी विभागप्रमुख म्हणून दीर्घकाळ काम केले. अमेरिकन साहित्यातील विशेष रुचीमुळे त्यांना फुलब्राइट शिष्यवृत्ती मिळाली व ते अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया' येथे गेले. त्यानंतर १९७८ ते ८१ मध्ये यूजीसीची 'नॅशनल फेलोशिप' मिळाली. १९८५ साली कॅनडाची 'सीनियर कॉमनवेल्थ फेलोशिप' मिळाली व १९८७ साली ब्रिटिश काऊन्सिलची केंब्रिज येथे व्हिजिटरशिप मिळाली. त्यांच्या ग्रंथसंपदेचा थोडक्यात आढावा :

History of Indian English Literature या विद्यार्थिप्रिय पुस्तकाचा NET व SET आदी परीक्षांच्या अभ्यासासाठी खूप उपयोग होतो. या पुस्तकातील इतिहासलेखन कधीच रूक्ष वाटत नाही कारण इतिहासासोबतच लेखकाच्या जीवनातील अनेक रोचक किस्से त्यांनी सांगितले आहेत. राज राव या प्रख्यात इंग्रजी कादंबरीकाराच्या 'The Serpent and the Rope' या कादंबरीत अद्वैत वेदान्त कसा येतो हे व आदिशंकराचार्यांचा 'रज्जुसर्प' हा सिद्धान्त अगदी सोप्या पद्धतीने नाईक विश्लेषित करतात. त्यांच्या संस्कृत व फ्रेंच भाषांवरील प्रभुत्वाची झलक बऱ्या ठिकाणी दिसते. भारतात इंग्रजी ही अभिव्यक्तीची भाषा होऊ शकते का हे; तसेच तोरु दत्त, मधुसूदन दत्त, हेन्री डेरोझिओ या भारतीयांची उदाहरणे देऊन त्यांनी इंग्रजीचा वापर सिद्धहस्तपणे कसा केला याचा उल्लेख केला आहे.

या पुस्तकाच्या लोकप्रियतेनंतर डॉ. नाइकांनी डॉ.

जो स्वतःवर प्रेम करू शकत नाही तो जगावर काय प्रेम करणार !

श्यामला नारायण यांच्या सोबत 'Indian English Leterature 1980-2000' हे अतिमहत्वाचे पुस्तक लिहिले असून या दोन पुस्तकांशिवाय भारतीय इंग्रजी साहित्याचा अभ्यास पूर्णच होऊ शकत नाही. या पुस्तकात १९८० मध्ये सुरू झालेल्या उत्तर-आधुनिक वादा (Post-Modernism) चा आढावा घेतला आहे. सलमान रश्दीच्या "Midnight Children" या कादंबरीने Postmodernism ची सुरुवात झाली व त्यानंतर २००० पर्यंतच्या साहित्याची समीक्षा केली आहे.

डॉ. नाइकांचा "Indian English Poetry "हा एक महत्त्वपूर्ण समीक्षाग्रंथ दिल्लीच्या अभिनव प्रकाशनाने २००६ मध्ये प्रकाशित केला. या पुस्तकाचे प्रास्ताविक अनेक अर्थांनी उल्लेखनीय आहे. काही आधुनिक भारतीय कवींच्या मते 'भारतीयांची इंग्रजी कविता ही स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचीच होय.' स्वातंत्र्यपूर्व काळातील कवींना भारतीय इंग्रजी कवी म्हणता येणार नाही. अशा मतप्रवाहाचा समाचार घेताना डॉ. नाइकांनी योगी अरविंद, सरोजिनी नायडू व रवींद्रनाथ टागोर यांच्या लेखनाची स्तुती केली असून त्यांची भारतीय इंग्रजी साहित्यात पुनःस्थापना केली आहे. या पुस्तकातील "Ravindranath Tagor and Saint Tukaram" हा लेख टागोर व तुकाराम यांच्या वैश्विक प्रतिभेची साम्यस्थळे शोधणारा आहे.

डॉ. नाइकांचा मराठी संतसाहित्याचा व्यासंग दांडगा होता. त्यांच्या "All for the Dark God" या २००७ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात ज्ञानेश्वर, निवृत्ती, मुक्ताबाई, तुकाराम, नामदेव, चोखामेळा आदी वारकरी संतांच्या वाङ्मयाचे प्रातिनिधक स्वरूपातील इंग्रजी भाषांतर आहे. शीर्षकातील Dark God म्हणजे पांडुरंग होय. ज्ञानेश्वरांच्या अनेक विराण्या, स्थितप्रज्ञाची लक्षणे यांचे इंग्रजी भाषांतर अत्यंत प्रासादिक असून सकलसंतगाथेच्या धर्तीवर इंग्रतीत झालेला हा प्रयोग निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. (पूर्वी केवळ संत तुकारामांच्याच अभंगांचे दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी 'Says Tuka' पुस्तक लिहिले होते.)

डॉ. एम. के. नाइकांनी भारतीय इंग्रजी साहित्याच्या प्रत्येक प्रकारावर एक समीक्षणात्मक पुस्तक संपादित केले आहे. Prespectives of Indian Prose in English (1982), Perspectives of Indian Drama in English (1977), Perpectives of Indian Poetry In English (1982), a Perpectives on Indian Fiction in English (1985). त्यांची Aspect of Indian writing In English व Dimentions of Indian English ही दोन पुस्तके विशेष गाजली.

त्यांच्या समीक्षणात्मक ग्रंथांव्यतिरिक्त त्यांचे दोन विडंबनात्मक काव्यसंग्रह प्रकाशित झाले. "Indian limericks" व "Beowulf and all that" या दोन पुस्तकांत Light Verse अर्थात नर्मविनोदी असे काव्य आहे. "Unosthodox History of Indian English Literature in Comic Verse" हे पुस्तकदेखील नाइकांची विडंबनात्मक विनोदशैली अधोरेखित करते. त्यांनी 'एमकीन' या टोपण नावाने लेखन केले.

डॉ. नाइकांनी "Corridors of knowledge" ही ''कॅम्पस नॉव्हेल'' या इंग्रजी साहित्यप्रकारातील कादंबरी लिहिली आहे. कर्नाटक विद्यापीठातील त्यांच्या प्रदीर्घ अध्यापनाच्या अनुभवावर आधारित असलेली ही कादंबरी भारतीय शिक्षणसंस्थांमधील शैक्षणिक वातावरणाचे हुबेहूब चित्रण करते.

अगदी मागच्या वर्षापर्यंत ते लेखनात व्यग्र होते. महाभारत, रामायण व पुराणांमधील काही चमत्कारिक गोष्टींना आधुनिक परिप्रेक्ष्यात पाहण्यासाठी त्यांवर ग्रंथ लिहिण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला होता. दोन ते तीन वेळेला मी त्यांच्या लेखांचा लेखक झालो आहे. ते हळू आवाजात बोलत असत व हात थरथरत असल्यामुळे त्यांना लिहिता येत नसे. परंतु प्रज्ञा अतिशय प्रखर असल्यामुळे चॉसर, शेक्सपिअर ते टी.स. इलियटपर्यंतचा इतिहासपट

त्यांना तंतोतंत आठवत असे. एका प्रतिभावंताची प्रतिभा आपल्या डोळ्यांसमोर आपल्या हाताने शब्दबद्ध होत असतानाचा अनुभव फार समृद्ध करणारा असे.

भारतीयांनी इंग्रजी भाषा वापरताना केवळ इंग्रजी संस्कृतीच्या आहारी न जाता अनेक भारतीय पुराणकथांचे इंग्रजीत पुनर्लेखन करून आदानप्रदान करावे. रामायणातील सीतेवर स्त्रीवादी लेखिका लिहितात, परंतु राजमहालात राहून वनवासाची शिक्षा भोगणाऱ्या लक्ष्मणाच्या पत्नीची - 'उर्मिलेची' - कथा कोणी इंग्रजीत लिहील काय असा प्रश्न त्यांना पडत असे.

भारतीयांच्या वाङ्मयामील मूर्धन्यस्यानी असलेल्या उपनिषदांना भारतीयांपेक्षा पाश्चात्त्य विद्वानांनीच साहित्यात अमर केले. टी.एस. इलियटच्या 'Waste Land' या कवितेत बृहदारण्यक उपनिषदातील ''दत्त। दयध्वम्। दम्यताम्।।'' हा मंत्र वापरला आहे.

डॉ. नाईक म्हणतात, "It is ironical that we seem to know Brihadaranyak Upnishad through an Englishman, just Max Muller, the German, who teacher the vedas." त्यांच्यामते भारतीय नृत्याचे नान प्रकार फेबियन बोवर्स या पाश्चात्त्य विद्वानाने आपणांस सांगावे तर लॉर्ड कनिंगहॅम या प्राच्यविद्येच्या अभ्यासकाने 'खरोष्ठी' लिपी शिकून सम्राट अशोकाचे महत्त्व भारतीयांना पटवून द्यावे याच्याएवढी शोकांतिका ती कुठली? याचे अगदी अलीकडील उदाहरण म्हणजे ज्ञानपीठविजेते इंग्रजी लेखक गिरीश कर्नाड. त्यांच्या 'हयवदन' या इंग्रजी नाटकाची प्रेरणा त्यांना थॉमस मान या अमेरिकन लेखकाच्या 'Transposed Heads' या कथेतून मिळाली. ही कथा म्हणजे 'कथासरित्सागर' या संस्कृत कथासंग्रहातील एक कथेचे भाषांतर होय. भारतीय लेखकाला मूळ संस्कृतपेक्षा इंग्रजीत भाषांतरित कथेतून प्रेरणा मिळते हा चमत्कारिकच अनुभव आहे. भारतीय इंग्रजी साहित्यातील 'Indianness' नेमका कुठला असा मूलगामी प्रश्न डॉ. नाईक विचारतात.

एकदा अनौपचारिक गप्पांमध्ये बोलताना डॉ. नाईक म्हणाले होते. ''भारतीय इंग्रजी साहित्याचे स्वरूप रोमन देवता 'जेनस' प्रमाणे असले पाहिजे. रोमन मिथकानुसार या देवतेला एक समोरच्या दिशेने व दुसरे मागच्या दिशेने अशी दोन मुखे असतात. त्याप्रमाणे भारतीय इंग्रजी साहित्याने मागच्या बाजूने आपल्या वेद, उपनिषाद, त्रिपिटकादी ज्ञानशाखांचे परिशीलन करावे तर त्याच वेळी आधुनिक साहित्यप्रकाराचे सजग भाग असण्याचा पुरोगामीपणादेखील दाखवला पाहिजे.'' डॉ. नाइकांना एका अर्थाने भारतीय इंग्रजी साहित्याच्या उज्ज्वल भविष्याबाबत खात्री वाटते. सध्या बाजारात बेस्टसेलर असलेली अमीश त्रिपाठीची 'मेलूहा ट्रायलॉजी' व अशोक बँकरची रामायण सीरिज पाहिल्यास याचा प्रत्यय येतो. नुकतीच नील मुखर्जी यांची "The livers of others" ही कादंबरी बुकर प्राइझसाठी शेवटपर्यंत यादीत होती.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानयोग्याची लक्षणे सांगताना एक विलक्षण ओवी वापरली आहे.

जे चालते ज्ञानाचे बिंब। जयाचे अवयव सुखाचे कोंब।<br>
थेर मनुष्यपण ते भांब। लौकिक दिसे।।

अर्थात ज्ञानयोगी हा चालतेबोलते ज्ञानाचे बिंब (Walking Encyclopadia) असतो. त्याचे लौकिकार्थाने माणूस असणे हे केवळ दृश्य स्वरूप असते मात्र तो अंतःकरणामध्ये निरंतर ज्ञानाची दिवाळी अनुभवत असतो. डॉ. नाइकांचे हे संशोधनकार्य पुढच्या अनेक पिढ्यांसाठी निःसंशय प्रेरणादायी ठरेल.

**प्रशांत पु. धर्माधिकारी**
साहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी : ९४२२४९५०९४

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांनी राज्य पातळीवर सादर केलेल्या प्रकल्पाची निवड राष्ट्रीय पातळीवर झाली आहे.**

विषय - वाहनांमधून बाहेर पडणाऱ्या धुरातील घटकांचा हवेवर होणारा परिणाम व त्यावरील उपाय योजना यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला.



सहभागी विद्यार्थी : मयुरेश पाटील, पुजा आसवले, नारायण गवस, यश खेराडे, अद्वैत जोशी
मार्गदर्शक शिक्षक : श्री. संजय दिघे, सौ. उज्ज्वला धोत्रे

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०१४ - माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल :**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ६३
उत्तीर्ण विद्यार्थी - ६१

शहरी विभागातील शिष्यवृत्तिधारक विद्यार्थ्यांची नावे आणि क्रमांक खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | दिशा चक्रवर्ती | ११ |
| २ | ध्रुव क्रिष्णन | ११ |
| ३ | विघ्नेश कदम | १३ |
| ४ | पालव खांडेकर | १३ |
| ५ | अमेय दानोले | १४ |
| ६ | अमय कढे | १६ |
| ७ | वेदान्त केळकर | १९ |
| ८ | तनुजा महाजन | १९ |
| ९ | राज पाटील | २० |
| १० | निहार बाम | २२ |
| ११ | आकाश गोरे | २२ |
| १२ | ऋतुज बारगोडे | २६ |
| १३ | मकरंद भालेराव | २७ |
| १४ | तरंग डोंगा | २७ |
| १५ | श्रेयस शिंदे | २७ |
| १६ | सुचित गुप्ते | २९ |
| १७ | सिमरन हुद्देदार | ३० |
| १८ | स्तवन जाधव | ३० |
| १९ | ऋतुजा जोशी | ३० |

**श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा**

छोटा गट - अनुराग शेट्ये - उत्तेजनार्थ पारितोषिक
मोठा गट - विश्वराज बोरकर - द्वितीय पारितोषिक

**आदर्श शिक्षक आणि आदर्श विद्यार्थी पुरस्कार**

- उपवन लायनेस क्लबतर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. मनीषा साळी यांना तर आदर्श विद्यार्थी पुरस्कार कु. अनुजा नर्नावर हिला मिळाला.
- ब्राह्मण सेवा संघातर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार श्री. अशोक आहेर यांना मिळाला.

**हिंदी राष्ट्रभाषा आयोजित विविध स्पर्धांचा निकाल**

| स्पर्धा | विजेत्याचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| निबंध (इ. ९ व १० वी) | मानव खामकर | ४ थे |
| हस्ताक्षर (इ. ५ व ६ वी) | प्रीती खामकर | १ ले |
| चित्रवर्णन (इ. ६ वी) | निधी सुर्वे | विशेष |
| चित्रवर्णन (इ. ५ वी) | श्रावणी मुर्कुटे | विशेष |

• एन. आय. ई. टाइम्स ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या 'थिंक अँड लर्न' या स्पर्धेत कु. रिया गुजरे हिला विशेष पारितोषिक मिळाले.

• विशाखापट्टणम इथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय गणित व विज्ञान महोत्सवात आमच्या विद्यार्थ्यांनी 'पर्सनल कॅरियर पॉवर्ड बाय हायड्रो इलेक्ट्रिक अँड सोलर एनर्जी' हा प्रकल्प सादर केला. हा प्रकल्प प्रेक्षकांकडून नावाजला गेला. या प्रकल्पातील सहभागी विद्यार्थी -

१) कु. श्रेयस केळकर
२) कु. धीर सावला
३) कु. दर्शन पाटील

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१. इंडिया बुल्स फाऊंडेशन स्कॉलरशीप :**

प्रथम वर्ष विधी विद्यार्थ्यांना इंडिया बुल्स फाऊंडेशन तर्फे स्कॉलरशीप देण्यात आली. त्यात फि ची पुर्ण रक्कम समाविष्ट आहे. ज्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप देण्यात आली त्यांची नावे खालील प्रमाणे.

१) मारुती खरात २) नीदा खोत ३) माया कांबळे
४) राहूल लोंढे ५) श्यामजी चौहान

**२. ओरिएंटेशन प्रोग्राम :**

ग्रंथपाल शितल औताडे ह्यांनी ग्रंथपाल व प्राध्यापक ह्यांच्या करीता असलेला ओरिऐंटेशन यशस्वीरित्या पुर्ण केला. त्यात त्यांनी 'A' ग्रेड संपादन केला.

**३. विद्यापीठ परिक्षा :**

मुंबई विद्यापिठाच्या II, IV, VI, LLB साठीच्या परिक्षा दि. १७ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान घेण्यात आली, आमचे महाविद्यालय देखील परिक्षेचे केंद्र होते.

**४. प्रथम, द्वितीय व तृतीय विधी वर्गाची सराव परिक्षा :**
दि. १० नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर या दरम्यान घेण्यात आली.

**५. संविधान दिवस २६.११.२०१४**

महाराष्ट्र शासनाच्या दि. २१/११/२०१४ रोजी मिळालेल्या परिपत्रकाप्रमाणे आमच्या वि.प्र.म. च्या ठा.म.पा. महाविद्यालयात दि. २६/११/२०१४ रोजी 'संविधान दिवस' अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयात ह्या दिवशी विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

प्रा. अनिरुद्ध बाबर विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांच्या समवेत सामुहिकरित्या 'संविधानाच्या प्रस्ताविकेचे' वाचन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर भारतीय संविधानावर आधारित चर्चा सत्रात विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला. संविधानाचे महत्व सांगणारि विविध भित्तीपत्रके महाविद्यालयात लावण्यात आली होती. महाविद्यालयातील ग्रंथालयात संविधानावर आधारित 'Law Quiz,' नामक परिक्षा घेण्यात आली.

अशा प्रकारे विविध प्रकारचे कार्यक्रम करुन महाविद्यालयात 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला.

प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार ह्यांनी दि. २६ नोव्हेंबर २०१४ रोजी जोशी - बेडेकर महाविद्यालय, ठाणे, येथील विद्यार्थ्यांना 'भारतीय राज्यघटना' ह्यावर व्याख्यान वितरित केले.

**६. सी.सी.टि.व्ही :-**

विद्या प्रसारक मंडळाच्या सहकार्याने विधी महाविद्यालयात चार C.C.T.V. बसवण्यात आले.

●●●

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

विक्रीला काढले आहे. त्यांचे सहकारी क्रिक यांचे मानचिन्ह विकले गेले, पण ते त्यांच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांनी. श्री. वॅटसन यांनी लिहिलेले 'द डबल हेलिक्स' (The Double Helix) हे पुस्तक विज्ञान क्षेत्रामध्ये एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. लंडनच्या फायनानशियल टाइम्स या वृत्तपत्रात दिलेल्या मुलाखतीत (२९, ३० नोव्हेंबर २०१४), त्यांच्याजवळ असलेल्या या पुस्तकाच्या हस्तलिखिताची विक्री त्यांच्या वारसदारांनी भविष्यात करावी असे त्यांनी सांगून ठेवले आहे.



**श्री. आलीशर अस्मानौ** (**Alisher Usmanov**)

यापुढील घटना जास्त आश्चर्यकारक आणि प्रेरणादायी आहेत. रशियातील एक धनाढ्य व्यापारी श्री. आलीशर अस्मानौ (Alisher Usmanov) यांनी नुकतेच हे पदक चाळीस लाख डॉलरला लिलावात विकत घेतले, आणि त्या पैशांबरोबरच ते पदकही त्यांनी वॅटसन यांना परत केले. लोकप्रतिनिधी किंवा मंत्री म्हणून मिळणारे बंगले, मंत्रिपद गेल्यावरही राजकीय प्रतिनिधी वर्षानुवर्ष सोडत नाहीत. उलट त्यावर आपला मालकी हक्क असल्याचाच दावा ते करतात. आपल्या संपत्तीचे, अंगावर सोने वाहून किंवा आपल्या नातलगांच्या लग्नसमारंभाच्या निमित्ताने संपत्तीचे किळसवाणे प्रदर्शन करणारे लोकप्रतिनिधी कमी नाहीत. साहित्य संमेलनापासून, शपथविधीपर्यंत शाही दिमाखाने साजरे होणारे समारंभ दुसरे काय दर्शवितात? ''सत्ता किंवा विद्या विनयेन शोभते'' हे फक्त भिंतीवर टांगायचे वचन असल्याचा यांचा दृढ विश्वास दिसतो. राजकरणातील या 'नवश्रीमंती'ने भ्रष्टाचाराला ''शिष्टाचार'' करून टाकले आहे. या पार्श्वभूमीवर रशियन पुंजीपतीचे वागणे हे नुसतेच अभिनंदनीय नाही तर अनुकरणीयही आहे.

हेतुपुरस्सरपणे तर सोडाच, पण अकल्पितपणे केलेल्या अशा विधानांमुळे होरपळलेले असे वैज्ञानिक, राजकीय नेते, कलाकार हे जगात आजही दिसतात. या पार्श्वभूमीवर, गल्लीबोळापासून प्रथमदर्शनी भ्रष्टाचार सिद्ध झालेल्या श्री. लालूप्रसाद आणि श्रीमती जयललिता पर्यंतच्या सर्वांची त्यांच्या अनुयायांनी चालविलेली भलावण बघता अति दुःख होते. बॉम्ब खटल्यात शस्त्र बाळगल्याबद्दल शिक्षा झालेल्या संजय दत्तला राजकीय नेतृत्वाने दिलेली निरपराधपणची पावती काय, किंवा सिनेजगातातील त्याच्या सहकाऱ्यांनी त्याचे माजविलेले अवडंबर काय, हे सगळेच अनाकलनीय आहे. अशी उदाहरणे आज या देशामध्ये इतकी आहेत की, ती लिहायची म्हटल्यास शाई संपेल. या देशात न्यायदेवताही आंधळी आहे, हे ललितनारायण मिश्रा यांच्या खुनाचा प्राथमिक निकाल ३९ वर्षांनंतर लागतो यातून सिद्ध होते. या भयावह अंधकारात आशेचा किरण दिसतो तो, कुठल्याही बक्षिसाची अपेक्षा न बाळगणारे 'मंगळयान' यशस्वी करणारे वैज्ञानिक, आणि आपल्या प्राणाची आहुती देऊन देशाचे रक्षण करणारे काश्मीरपासूनच्या सर्वच सीमांवरील सैनिक यांच्यात!

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

# V.P.M.'s Polytechnic, Thane

# Information Technology Centre

'Jnanadweepa', Bldg. No.1, College Campus, Chendani Bunder Road, Thane (W) 400601.
**Tel : 25339866, Mob : 9619651156 Email : vpm_itcentre@vpmthane.org**

## POST GRADUATE ADVANCE DIPLOMA PROGRAMMES

Government Recognized Courses Affiliated to MSBTE, Mumbai For Graduates and Working Professionals

### ❖ Advance Diploma in Computer Software System Analysis and Applications (CP)

**Eligibility** - Any Diploma in Engineering or Technology / Any Degree
**Duration** - One Year - Part Time - Semester Pattern

### ❖ Advance Diploma in Industrial Safety (IT)

**Eligibility** - Any Science Graduate / Graduate in Medical Science / BDS / OT.PT / Graduate in Veterinary Science or its Equivalent from a recognized Statutory University / Board or Degree / Diploma in Engineering / Technology with Two years' experience in Manufacturing Maintenance or Safety Department of a factory or Two years' experience in enforcement of Legislation pertaining to Safety.
**Duration** - One Year - Full Time - Annual Pattern

### ❖ Advance Diploma in Energy Management and Audit (ER)

**Eligibility** - 1) Any Diploma / Degree in Engineering / Technology from a recognized statutory Board / University or its equivalent or
2) Science graduate from recognized University with 1 year relevant experience
**Duration** - One & Half Year - Part Time - Semester Pattern

## YCMOU Recognized MKCL's WAVE Certified Computer Courses

- Photo Editor
- Content Illustrator
- Desktop Publisher
- 2D Animator
- Graphic Designer
- Stationery Designer
- Web Designer
- Video Editor
- AutoCAD Draftsmen
- IT Hardware Support Technician
- Office Assistant
- Tour Planner
- Excel expert
- Presentation Specialist
- Marketing Executive
- Tally Expert
- C Programmer
- C++ Programmer

## MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स !

MKCL

## Mastering JEE

ENSURE EXCELLENT SCORES IN JEE
For FYJC & SYJC Science students!

MKCL
Creating a Knowledge Lit World

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.